
सोमवार, ९ जानेवारी २०२३
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १७२
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

संजय राऊतांवर मानसिक आघात होत असावेत -चित्रा वाघ/२
भिंगारीत शॉर्टसर्किटमुळे कार जळून खाक/३
स्व. प्रभाकर राणे चषकाचा मरीदेवी संघ मानकरी /८

## अवनी चतुर्वेदीचा एरियल वॉर गेममध्ये सहभाग



**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलातील स्क्वॉड्रन लीडर अवनी चतुर्वेदी नवा इतिहास रचण्याच्या तयारीत आहे. स्क्वॉड्रन लीडर अवनी चतुर्वेदीसह भारतीय हवाई दलाच्या तीन महिला वैमानिक देशाबाहेर होणाऱ्या एरियल वॉर गेममध्ये भारतीय सैन्यदलाचा भाग असणार आहेत. ही ऐतिहासिक कामगिरी करणारी ती भारतातील पहिली महिला पायलट ठरणार आहे. अवनी चतुर्वेदी सुखोई लढाऊ विमान उडवणार आहे. एएनआयच्या रिपोर्टनुसार, वीर गार्डियन २०२३ हवाई सराव १६ ते २६ जानेवारीदरम्यान घेण्यात येणार आहे. हा सराव जपानमध्ये आयोजित करण्यात आला आहे. ओमिटामा येथील हयाकुरा एअर बेस, त्याच्या आसपासचे हवाई क्षेत्र आणि सायमा येथील इरुमा एअर बेस येथे हा सराव केला जाणार आहे.

### पोलीस मित्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा समर्थकांसह पक्षप्रवेश

# कर्जतमध्ये भाजपची ताकद वाढतेय -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किशोर शितोळे व कोकण अध्यक्ष रमेश कदम यांच्यासह पोलीस मित्र संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. ८) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, कर्जतमध्ये भाजपची ताकद आणखी वाढणार असून कार्यकर्त्यांनी पक्षवाढीसाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन केले.**



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास भाजपचे कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा सरचिटणीस रमेश मुंडे, तालुका सरचिटणीस संजय कराळे, युवा मोर्चा अध्यक्ष प्रमोद पाटील, बीड जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष नवीन देशमुख, पंचायत समिती विभाग अध्यक्ष योगेश घारे, वेणगाव पंचायत समिती अध्यक्ष किरण घाग, किसान मोर्चा कार्यकारिणी सदस्य वसंतराव महाडिक, ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेव मोरे उपस्थित होते.

पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व शिवशाही माथाडी कामगार संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर शितोळे, कोकण प्रदेश अध्यक्ष व समधर्म समभाव सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश कदम, रायगड उपाध्यक्ष राकेश पवार, कर्जत युवाध्यक्ष हेमंत कदम, सदाशिव कदम, गणेश कदम, यश करम, सतिश देशमुख, समीर शितोळे, धनंजय शितोळे, नंदकुमार शिंदे, संदेश शिंदे, नितीन देशमुख, राकेश पवार, पिंट्या डाबीया, संदीप जाधव, सागर धनवटे, मंगेश चव्हाण, महेश फाले, महेंद्र धनवटे, प्रवीण गवळी, महेश आगीवले, नामदेव आगीवले, मनोज हिलम, प्रवीण पोट, रोशन आगिवले, विश्वास दर्डा, प्रकाश कामठी, कृष्णा निरगुडा, राजू पारधी, यशवंत मेहतकर, अनिल जोशी, हनुमंत जोशी, भास्कर रामा शेंडे, पाडुरंग देऊ निरगुडा, गणपत आंबो हिंदोला, मोतीराम चोरघे, गजानन धुले, छगन पाटील, काशिनाथ निरगुडा, काशिनाथ रसाल, गणपत हिमाली, सुरेश ताली, तुकाराम बांगार, बाबू आगिवले, प्रीतम ठाकरे, प्रभाकर गवळी यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, तुमच्या प्रवेशामुळे कर्जत तालुक्यामध्ये भाजपला ताकद मिळाली आहे, त्या अनुषंगाने तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असून पक्षाचा जास्तीत जास्त प्रचार करा, असे आवाहन केले.

> **देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या विकासासाठी अहोरात्र काम करीत आहेत. तळागाळातील सर्व घटकांपर्यंत विकास पोहचविण्याचे काम सतत होत आहे. जनआरोग्य, उज्ज्वला, अन्नसुरक्षा-रेशन, विमा, किसान सन्मान, घरकुल, असे अनेक लोकहिताचे निर्णय आणि योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे करीत सर्वसामान्य नागरिकाला सक्षम करण्याचे काम झाले आहे. जगातील सर्वांत मोठ्या आणि सर्वसामान्य माणसाचा विचार करणाऱ्या पक्षात तुम्ही सहभागी झाले आहात. तुमच्या प्रवेशामुळे कर्जत तालुक्यामध्ये भाजपला आणखी ताकद मिळाली आहे, त्या अनुषंगाने तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असून पक्षाचा जास्तीत जास्त प्रचार करा.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हाध्यक्ष, भाजप**

# 'लोकसभा निवडणुकीआधी देश नक्षलवादमुक्त करू'

**कोर्बा (छत्तीसगड) : वृत्तसंस्था**

गेल्या दशकभरात नक्षल हिंसाचारात घट झाली असून, २०२४च्या लोकसभा निवडणुकीआधी देश नक्षलवादमुक्त करण्याची घोषणा शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. नक्षलग्रस्त छत्तीसगडमधील कोर्बा शहरातील सभेत ते बोलत होते.

या वर्षी छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणूक होत असून भाजपने रणशिंग फुंकले आहे. या वेळी भूपेश बघेल यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारला सत्तेवरून खाली खेचण्याचे आवाहन शाह यांनी मतदारांना केले. २०२४मध्ये नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधानपदी यावेत, असे वाटत असेल तर भाजपलाच मतदान करा, असे शाह म्हणाले. राज्यातील वाढता भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीला काँग्रेसचे बघेल सरकारच जबाबदार असल्याचा आरोपही शाह यांनी केला. केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना २००९मध्ये नक्षल हिंसाचाराच्या घटनांची संख्या २,२५८ एवढी होती. ती २०२१मध्ये ५०९पर्यंत खाली आली,



असे शाह म्हणाले.

नरेंद्र मोदी सरकारने केवळ शस्त्रे हाती घेणाऱ्या नक्षलग्रस्त भागातील तरुणांना शिक्षण आणि रोजगार मिळावा याची हमी दिली नाही तर शस्त्रे बाळगणाऱ्यांचे उच्चाटन करण्यासाठीही काम केले, असे शाह यांनी सांगितले.

मुख्यमंत्री बघेल यांनी गेल्या पाच वर्षांत काय केले, असे विचारले तर ते काय उत्तर देतील, असा मला प्रश्न पडतो. वास्तविक त्यांनी राज्यासाठी काहीही केले नाही. त्यांनी भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी वाढवण्यासाठीच काम केले, असा आरोप शाह यांनी केला.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा दिल्या. या वेळी वाय. टी. देशमुख यांचे बंधू जयवंत देशमुख, कमलाकर देशमुख, विश्वनाथ कोळी, अजय कांडपिळे आदी उपस्थित होते.**

## निवडक

### मुंबईत बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी देणाऱ्याला अटक

**मुंबई :** दोन महिन्यांत मुंबईत १९९३सारखा साखळी बॉम्बस्फोट होणार असा फोन पोलीस कंट्रोलला रविवारी (दि. ८) करण्यात आला. या फोनप्रकरणी मालाडमधून एकाला अटक करण्यात आली आहे. मुंबईतील माहीम, भेंडी बाजार, नागपाडामध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याचा दावा या फोन करण्यात आला आहे. मुंबई एटीएसने तपास करीत एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

### हिंगोली जिल्ह्याला पुन्हा बसला भूकंपाचा धक्का

**हिंगोली :** जिल्ह्यामध्ये पुन्हा रविवारी (दि. ८) सकाळी ४.३० वाजताच्या सुमारास वसमत, औंढा नागनाथ आणि कळमनुरी या तालुक्यातील अनेक गावांना भूकंपाचा धक्का जाणवला. जिल्ह्यात ३.६ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली आहे. या भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा आर्थिक हानी झाली नसली तरी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव



कामोठे येथील विद्यालयात क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या प्रांगणात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात झाला. या महोत्सवाचा बक्षीस वितरण समारंभ 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ७) झाला. विविध क्रीडा स्पर्धांमधील विजयी विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

दोन दिवसांपासून सुरू असणाऱ्या या महोत्सवात विद्यार्थ्यांनी रिबीन डान्स, लेझीम, लाठी-काठी, दांडपट्टा यांचे सादरीकरण केले. त्याचबरोबर शिवकालीन राज्य, छत्रपती शिवाजी महाराज यांची आठवण करून दिली. या समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांना गौरविण्यात आले.

या वेळी मुंबईचे शिक्षण विभाग अधिकारी श्रीकांत गायकवाड, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर, शहाजी फडतरे, इंग्लिश मिडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सीबीएससीच्या मुख्याध्यापिका रजीशा नाईर, राहुल काशीद, कविता दीपक, बाळासाहेब कारंडे, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांकडून उत्तेजक द्रव्ये जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस भरतीसाठी आलेल्या दोन उमेदवार व त्यांच्या साथीदाराकडून पोलिसांनी उत्तेजक द्रव्ये जप्त केली. दोघांच्या रक्ताचे नमुने पुढील तपासणीसाठी मुंबईला पाठविण्यात आले आहेत.

वरसोली येथील कॉटेजमध्ये पोलीस भरतीकरीता आलेल्या उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्ये असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना शनिवारी (दि. ७) मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी कॉटेजमध्ये धाड टाकली. तेथे तीन जण होते. त्यापैकी दोघे पोलीस भरतीकरीता आले आहेत. एकाची मैदानी चाचणी शनिवारी झाली. एकाची रविवारी होती. तूर्तास या तिघांना सोडून देण्यात आले आहे.

(सविस्तर वृत्त पान २ वर...)

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर कारचा भीषण अपघात

### तिघांचा मृत्यू, चौघे गंभीर जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रविवारी (दि. ८) दुपारी १.२५ वा. च्या सुमारास महालक्ष्मी मंदिरासमोरील पुलावर झालेल्या अपघातात तीन प्रवासी ठार झाले असून चार प्रवासी गंभीररित्या जखमी झाले आहेत.

राष्ट्रीय महामार्गाच्या गुजरातकडे जाणाऱ्या मार्गिकेवर एका कारचालकाचा ओव्हरटेक करताना कारवरील ताबा सुटून पुढे जाणाऱ्या कंटेनरला जोरात धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर चौघे गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एक वर्षाच्या चिमुकलीचाही समावेश आहे. जखमींवर कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

खड्डा चुकवताना चालकाने चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करताना हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. कारमधील मृत नालासोपारा येथील असल्याची माहिती समोर आली आहे.




# दासगावमध्ये रंगला होडी स्पर्धांचा थरार

**महाड : प्रतिनिधी**

दासगावमधील श्री रंगावली संस्थेतर्फे आपली परंपरा जपण्याच्या हेतूने होडी स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. ८) केले होते. 'वल्हव रे नाखवा वल्हव...वल्हव' म्हणत होडीतील नाखव्याने भरतीचे पाणी आणि सोसाट्याचा वारा सहन करीत स्पर्धेतील आपले लक्ष गाठण्याचा प्रयत्न केला. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून यावर्षी होडी चालवण्यात या प्रथम क्रमांक जयेश मिंडे, परेश निवाते, आदिनाथ मिंडे यांनी पटकावला.

गेली अनेक वर्षे दासगाव परिसरातील भोई समाज आपला उदरनिर्वाह होडीतून मासेमारी आणि वाळू काढून करीत आहेत. यामुळे आपली परंपरा जपली जावी, या हेतूने ही स्पर्धा आयोजित केली जाते. रविवारी सकाळी होडी चालवण्याच्या या स्पर्धेला प्रारंभ झाला.



गावातील तरुण आणि महिला वर्गाने वैविध्यपूर्ण वेशभूषा करीत या स्पर्धेतील स्पर्धकांना प्रोत्साहित केले. यामुळे दासगाव बंदर परिसरात एकच उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

मुंबई आणि अन्य शहरात असलेल्या भोई समाजाच्या लोकांनीदेखील स्पर्धा पाहण्यासाठी हजेरी लावली होती. आठ होड्यांचा एक गट याप्रमाणे रेल्वेपुलाजवळून होड्यांना सूचना देताच स्पर्धेला सुरुवात झाली. प्रत्येक होडीत तीन स्पर्धक बसवण्यात आले होते.

स्पर्धेत प्रथम जयेश मिंडे, परेश निवाते, आदिनाथ मिंडे, द्वितीय दिपेश निवाते, रुपेश पड्याळ, निखिल निवाते, तृतीय सुमेश जाधव, प्रणेश निवाते, स्वप्नील जाधव, चतुर्थ प्रियेश निवाते, सतिश निवाते, धर्मेंद्र पड्याळ यांनी पटकावले.

आकर्षक होडी सजावट प्रथम संतोष पड्याळ यांच्या गुरुकृपा होडीला, द्वितीय बाळकृष्ण मिंडे यांच्या दर्यादौलत होडीला, तर तृतीय क्रमांक गणेश मिंडे यांच्या लक्ष्मी होडीला देण्यात आला.

### *विविध पारितोषिकांचे वितरण*

*स्पर्धेदरम्यान आकर्षक पेहराव करणाऱ्या रोहित मिंडे (वासुदेव) प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, कौस्तुभ मिंडे (छत्रपती शिवाजी महाराज) आणि तृतीय क्रमांक सानवी मिंडे (मच्छीवाली), उत्कृष्ट नाखवा प्रथम जयेश मिंडे, द्वितीय रुपेश पड्याळ, तृतीय क्रमांक सुमेश जाधव यांनी पटकावला.*

# संयुक्त राष्ट्रसंघाकडून २०२३ आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष जाहीर

**मुरुड : प्रतिनिधी**

भारतीय कृषी संस्कृतीचा अनिवार्य घटक असलेल्या तृणधान्याला जागतिक स्तरावर आता विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष जागतिक धान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे.

भारताने संयुक्त राष्ट्रसंघात यासंबंधीचा ठराव मांडला होता. तृणधान्यांचे आहारातील महत्त्व जाणून घेऊन त्यांचा वापर दैनंदिन आहारामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी या धान्याचे लाभ जनसामान्यांच्या मनावर विविध स्तरांतून बिंबवणे आवश्यक आहे. या उद्देशाने संयुक्त राष्ट्रांनी २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून



घोषित केले आहे.

तृणधान्यात भात, ज्वारी, बाजरी, राजगिरा, कोद्रो, कुटकी, सावा, राळा, वरई (भगर), नाचणी या पिकांचा समावेश होतो. तृणधान्य पिकांची वैशिष्ट्ये म्हणजे या पिकांमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर अल्प प्रमाणात होतो. या पिकांमध्ये उच्च पौष्टिक मुल्ये असतात आणि पचायला हलकी असतात. धान्याच्या पिकांची वाढ कोरडवाहू जमिनीसह पर्जन्यवृष्टी असलेल्या परिस्थितीतही होते. अगदी निकृष्ट दर्जाच्या मातीतही तृणधान्याचे पीक घेता येते.

तृणधान्य पिके वातावरणातील ताण सहन करणारे तसेच कीडरोगांना प्रतिकार करतात. तेव्हा शेतकरी वर्गानेही तृणधान्य पिकवावे, तसेच नागरिकांनी तृणधान्याचा दैनंदिन आहारात समावेश करावा, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

# रायगड पोलीस भरतीला आलेल्या उमेदवारांकडून उत्तेजक द्रव्ये जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस भरतीसाठी आलेले दोन उमेदवार व त्यांच्या एका साथीदाराकडून पोलिसांनी उत्तेजक द्रव्ये जप्त केली. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. दोघांच्या रक्ताचे नमुने पुढील तपासणीसाठी मुंबईला पाठविण्यात आले आहेत. त्यांच्या रक्ताच्या नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामधील निष्कर्शावरुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

३ जानेवारीपासून रायगड जिल्हा पोलीस भरती सुरु आहे. भरती प्रक्रियेसाठी रायगड जिल्हा व जिल्ह्याबाहेरून बहुसंख्य उमेदवार हे अलिबागमध्ये आलेले आहेत. वरसोली येथील नाईकआळीतील अजय अरूण तिवरेकर यांच्या मालकीच्या कॉटेजमध्ये पोलीस भरती मैदानी चाचणीकरीता आलेल्या काही उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्ये आहेत, अशी माहिती अलिबाग पोलिसांना ७ जानेवारी रोजी मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी कॉटेजच्या रूममध्ये गेले. तेथे तीन जण होते. त्यापैकी दोन जन पोलीस भरतीकरीता आलेले उमेदवार आहेत. एकाची मैदानी चाचणी ७ जानेवारीला झाली. एकाची ८ तारखेला मैदानी चाचणी होती. तिसरा त्यांच्या सोबत आला होता.

पोलिसांनी या तिघांची झडती घेतली असता दोन न्युरोकाइन्ड गोल्ड इंजेक्शन, नाव नमुद नसलेल्या औषधी द्रव्यांनी भरलेल्या काचेच्या तीन बंद बॉटल, पाच ओमेगा व्हीआयटी सीई टॅबलेटस, तीन निप्रो कंपनीच्या सिरींज सुईसह, एक डिस्पोव्हॅन कंपनीची हायपोडर्मिक सिरींज, डिस्पोव्हॅन कंपनीच्या सहा पॅक बंद असलेल्या ४४ डीच्या नीडल्स, एक लाल रंगाची कॅप्सुल, डिस्पोव्हॅन कंपनीच्या दोन ३२ एनच्या नीडल्स, एक बीडी यू ४० इन्सुलिन असे नाव असलेली सिरींज नीडलसह त्यामध्ये औषधी द्रव्य भरलेले सापडले. साहीत्य जप्त करण्यात आलेले आहे.



मैदानी चाचणीच्या अगोदर या गोळ्या व औषधे घेतल्यास त्याचा फायदा मैदानी चाचणीमध्ये होतो, असे एका आरोपीने सांगितले. या घटनेची चौकशी अलिबाग पोलीस ठाणे करीत असून चौकशीमध्ये पुरावे आढळून आल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

तिघांची जिल्हा सामान्य रूग्णालय, अलिबाग येथील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून रक्ताचे नमुने काढून घेण्यात आलेले आहेत. ते रक्ताचे नमुने तपासणीसाठी मुंबई व नवी मुंबई येथे पाठविण्यात येणार आहेत. तूर्तास तिन्ही व्यक्तींना सोडून देण्यात आलेले असून त्यांच्या रक्ताच्या नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामधील निष्कर्शावरून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

> **उमेदवारांनी शासनाने प्रतिबंधित केलेली कोणतीही वस्तू/पदार्थ किंवा उत्तेजक द्रव्य सेवन करून भरती प्रक्रियेला सामोरे न जाता प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. जे उमेदवार असे गैरप्रकार करताना आढळून येतील त्यांचेवर कठोर आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**
>
> **–सोमनाथ घार्गे, पोलीस अधिक्षक, रायगड**

## संजय राऊतांवर मानसिक आघात होत असावेत

### भाजप नेत्या चित्रा वाघ यांची टीका

**सोलापूर : प्रतिनिधी**

संजय राऊत हे खूप मोठ्या गॅपमधून बाहेर आले आहेत, त्याच्यावर शारीरिक, मानसिक आघात होत असावेत, त्याच्या परिणाम दूरगामी असतो. त्यातून ते अजून ही बाहेर आले नाहीत, त्यामुळे ते अशा पद्धतीचे वक्तव्य करत राहतात त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही अशी टीका भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी शिवसेनेचे नेते खा. संजय राऊत यांच्यावर केली.

भारतीय जनता पार्टीच्या महिला प्रदेशच्या प्रमुख चित्रा वाघ आज सोलापूर दौऱ्यावर आहेत. भाजपच्या वतीने आयोजित केलेल्या महिला मेळाव्यास त्या उपस्थित राहणार असून तत्पूर्वी त्यांनी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधला. शिंदे–फडणवीस सरकार जोरदारपणे काम करत आहे. सरकार जाणार याबाबत मला काही माहिती नाही, पण संजय राऊत यांची झोप झाली नाही त्यांना झोपीची गरज आहे, झोप झाली की ते जागावर येईल ते व्यवस्थित बोलतील असेही चित्रा वाघ यांनी बोलले.

शिंदे– फडणवीस सरकार हे फेसबुकवरच ऑनलाइन सरकार नाही, लोकांच्या फेसवरती स्माईल आणणारे सरकार आहे. ऑनलाइन सरकार नाही ऑनफीड सरकार आहे. राज्यातील अनेक मंत्री हे मंत्रालयात न बसता ऑन फिल्डवर लोकांच्या समस्या व अडचणी याचबरोबर विकास कामे करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत.

त्या पुढे म्हणाल्या, एकेकाळी पवार यांच्या सानिध्यात काम केलं आणि आता फडणवीस यांच्यासोबत काम करीत आहे. फडणवीस एक व्हिजन असणारा नेता आहे. महाराष्ट्राला एका यशाच्या शिखरावर पोहोचवणारा नेता असेल तर एकमेव फडणवीस आणि ते आमचे नेते आहेत त्याचा आम्हाला अभिमान आहे.

## प्लास्टिक बरणीत मान अडकलेल्या मोकाट कुत्र्याला अखेर केले मुक्त

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पालीमध्ये एका मोकाट कुत्र्याच्या गळ्यामध्ये प्लास्टिक बरणी अडकल्याने तो अतिशय बेजार स्थितीत होता. अनेक दिवस या गळ्यातील प्लास्टिकची बरणी घेऊन तो सर्वत्र फिरत होता. अखेर पालीतील ह्युमन अँड ॲनिमल रेस्क्यू टीम व शिवऋण प्रतिष्ठानच्या सदस्यांनी शनिवारी (ता.७) पाली पंचायत समिती कार्यालयाजवळ या कुत्र्याला शिताफीने पकडले आणि त्याच्या गळ्यात अडकलेली प्लास्टिकची बरणी काढून त्याला मोकळे केले.



कुत्र्याला पकडण्यासाठी शिवऋण प्रतिष्ठानचे सदस्य अमर लहाने, गंगाधर पांडव यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. कुत्र्याला जाळे टाकून पकडले व त्याच्या गळ्याभोवती अडकलेली प्लास्टिकची बरणी कापण्यात आली. त्यानंतर कुत्रा मोकळ्या वातावरणात फिरू लागला. या भूतदयेबद्दल अनेकांनी शिवऋण प्रतिष्ठान व ह्युमन अँड ॲनिमल रेस्क्यू टीमचे कौतुक केले.

## भल्या मोठ्या अजगराची जाळ्यातून केली सुटका

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा येथील तळाच्या शेजारी लावलेल्या जाळ्यात चार ते पाच फूट लांबीचा अजगर अडकला होता. ही माहिती मिळाल्यानंतर सर्पमित्र मनोहर कुलकर्णी यांनी त्या भल्या मोठ्या अजगराला जाळीतून सोडून त्याला जंगलमय भागात सोडत जीवदान दिले.



अजगर अडकल्याची माहिती आपटा येथील भालेकर कुटुंबातील एका व्यक्ती ने दिली. यामुळे अजगराला जीवदान मिळाले आहे.

गावात कोठे काही आढळून आले की आपटा गावातील लोक मनोहर कुलकर्णी यांना माहिती देतात यामुळे अनेक सापांना जीवदान मिळत आहे.

## बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या रायगड जिल्हा संपर्क प्रमुखपदी प्रकाश देसाई

**पाली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने जिल्ह्यातील सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम, अष्टपैलू व दमदार नेतृत्व म्हणून सर्वपरिचित प्रकाशभाऊ देसाई यांची रायगड़ जिल्हा संपर्क प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. देसाई यांच्या सहभागाने पक्षाला संघटनात्मकदृष्ट्या मोठी उभारी व बळकटी मिळेल, असा विश्वास वरिष्ठांकडून व्यक्त केला जातोय. आ. महेंद्र दळवी यांच्या हस्ते पाली सुधागड येथील कार्यक्रमात प्रकाश देसाई यांना सन्मानपूर्वक नियुक्तीपत्र सुपूर्द करण्यात आले.



देसाई यांचा फार मोठा राजकीय अनुभव व ताकत बाळासाहेबांच्या शिवसेना पक्षाला मिळतण आहे असे आ. महेंद्र दळवी यांनी यावेळी सांगितले. प्रकाश देसाई हे बाळासाहेबांच्या शिवसेनेत सामील होत आहेत याचे दस्तरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी देखील या निर्णयाचे स्वागत केले.

यावेळी अलिबाग मुरुड मतदार संघाचे आ. महेंद्र दळवी, जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश भाऊ देसाई, जिल्हा प्रमुख राजा केणी, माजी जि प सदस्य, तथा सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख, माजी जि. प सभापती संजय जांभळे, उपजिल्हाप्रमुख अनुपम कुलकर्णी, युवक जिल्हाध्यक्ष संजय म्हात्रे, ॲड. मनोज शिंदे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## सीकेटी कॉलेजात जनजागृती; कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल स्वायत्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंमली पदार्थ विरोधी दल तथा मानवी तस्करी विरोधी दल, गुन्हे शाखा नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे च्या औचित्याने शुक्रवार (दि. ६) महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती राहिली.



कार्यक्रमाची सुरवात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्याहस्ते मान्यवरांच्या स्वागताने झाली. यांनतर चाईल्ड लाईफचे महेंद्र जाधव यांच्या संबोधनाने झाली. त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना अंमली पदार्थाचे सेवन केल्याने उद्‌भवणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांबाबत जागरुक केले.

Transforming Life Foundation या एन.जी.ओ. चे मनोहर वाघेला यांनी मानवी तस्करीबाबत भाष्य करत असताना मानवी तस्करीची संकल्पना स्पष्ट करत. आणि विविध कारणांसाठी होणाऱ्या मानवी तस्करींची वास्तविक उदाहरणे देत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

आशा की किरण फाऊंडेशन या नशामुक्ती करण्याऱ्या एन.जी.ओ. च्या प्रतिनिधींनी उपस्थित विद्यार्थ्यांसमक्ष अंमली पदार्थाच्या व्यसनाबाबत पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी स्वयंसेवकांशी मुक्त संवाद करत हास्य तथा विनोदाच्या माध्यमातून नशामुक्ती, मानवी तस्करी यांबाबत भाष्य केले. यासोबत यशस्वी व निरोगी आयुष्यासाठी कानमंत्र दिला.

सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील, व आभार प्रदर्शन निशा जांगीड या स्वयंसेवीकेने केले. यावेळी बी.एस.सय्यद, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (अंमली पदार्थ विरोधी दल, नवी मुंबई), अतुल आहेर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (मानवी तस्करी विरोधी दल, नवी मुंबई), बशीर कुरेशी (आशा की किरण फाऊंडेशन), एन.एस. एस.चे कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग उपस्थित होता.

## ओमकार मंडळाची सामाजिक बांधिलकी

**माणगाव : प्रतिनिधी**

ओमकार भजनी मंडळ खांदाड या मंडळाने विविध कार्यक्रम व उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. यावर्षी देखील सालाबादप्रमाणे श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. असून या महापूजेला बसण्याचा विशाल घर्वे व घर्वे यांना मिळाला.

या वेळी कोरोना योध्याचा सन्मान करण्यात आला. या वेळी आ. भरत गोगावले, नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, मंडळाचे सदस्य ॲड. राजीव साबळे, नितीन बामगुडे यांनी देखील उपस्थिती लावली होती. यावेळी मंडळाचे दिपक साबळे, नरेंद्र शेठ गायकवाड, अध्यक्ष–महेंद्र दळवी, उपाध्यक्ष अमित जाधव, सेक्रेटरी– विशाल घर्वे, वैभव साबळे, संजय आण्णा साबळे, दत्तात्रेय शिंदे, गणेश चव्हाण, प्रसाद शिंदे, दिलीप यादव, आबा दळवी, जयराम घरटकर, विजय यादव, निलेश यादव, मंदार शेलार, अरविंद जाधव, निलेश सुतार, नितीन जाधव, सुहास शिंदे आदी उपस्थित होते.

## वाशीत जैन समुदायाची रॅली मंदाताई म्हात्रे यांचा पाठिंबा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जैन धर्मियांचे झारखंड येथील तीर्थक्षेत्र श्री शत्रुंजय शिखर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याच्या झारखंड सरकारच्या निर्णयाविरोधात संपूर्ण भारतातील जैन समुदाय आक्रमक झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर ’नवी मुंबई सकल जैन संघाच्यावतीने महारॅली काढण्यात आली. या रॅलीस बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी जाहीर पाठिंबा देत आपण जैन बांधवांच्या मागे खंबीरपणे उभे आहोत असे सांगितले .



झारखंड सरकारने जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र असलेले श्री शत्रुंजय शिखर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. झारखंड सरकारच्या या निर्णयामुळे जैन धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्याचबरोबर जैन धर्मियांच्या गुजरात मधील पालीताणा येथील तिर्थस्थानाचे पावित्र्य अबाधित राहण्यासाठी तेथील अतिक्रमणे हटविणे, अनधिकृतरित्या सुरु असलेल्या खाणी बंद करुन या पवित्र भूमीचे रक्षण करणे, येथील प्रथम तिर्थंकर आदीनाथ भगवान यांच्या पादुका खंडीत करणाऱ्या विरोधात कारवाई करण्याची मागणी जैन समुदायाने केली आहे. त्यामुळे आपल्या या दोन्ही धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखण्यासाठी विविध राज्यांमध्ये जैन समाज संघटना रस्त्यावर उतरुन झारखंड सरकारचा निषेध करीत पर्यटन क्षेत्र घोषित करण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी करत आहे.

नवी मुंबईतील जैन समुदायाने देखील झारखंड सरकारच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यासाठी नवी मुंबई सकल जैन संघच्या माध्यमातून रविवारी निषेध रॅली काढण्यात आली .

प्रारंभी, सकाळी वाशी, सेक्टर– ९ मधील महावीर जिनालय येथून निषेध रॅलीला सुरुवात करण्यात आली . त्यानंतर वाशी शिवाजी चौक, अग्निशमन केंद्र समोरुन मुख्य रस्त्यावरुन निषेध रॅली ब्लू डायमंड हॉटेल मार्गे अँकरवाला शाळेच्या मैदानात पोहोचल्यावर रॅलीचे सभेत रुपांतर झाले.

## मुंबई–पुणे महामार्गावरील शिळफाटा परिसर वाहतूक कोंडीचे बनलेय केंद्र



**खोपोली: प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील शिळफाटा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील भाग वाहतूक कोंडीचे केंद्र बनले आहे.

या भागात इंदिरा गांधी चौकात मुंबई पुणे जुन्या मार्ग महामार्गावरून पुणेकडून येणारी शनिवारी व रविवारी मोठ्या प्रमाणात वाहनांची संख्या असते, त्याचप्रमाणे ढेकू व आडूशी पट्ट्यातील कारखान्यातील गाड्या सायंकाळी खोपोलीकडे येत असतात, एकाच वेळी वाहनांची संख्या संध्याकाळी वाढत असल्याने या भागात अर्धा ते एक तास सतत वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे या भागात वाहनचालकांमध्ये तसेच स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

या प्रचंड वाहतूक कोंडीची जबाबदारी कोणी घ्यायची यावरूनही नगरपालिका प्रशासन व पोलीस हे एकमेकांकडे बोट दाखवीत आहेत. या प्रचंड वाहतूक कोंडीमध्ये मात्र वाहनचालकांचे व प्रवाशांचे हाल होत आहेत. एकदा नगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी एकदा समन्वय साधून हा होणारा त्रास कमी करावा अशी मागणी आग्रहाने होत आहे.

तसेच आज नेहमीप्रमाणे रविवार असल्याने मोठ्या प्रमाणात खंडाळा, लोणावळा या भागात आलेल्या मुंबईकरांची वाहने मुंबईच्या दिशेने जात असताना खोपोलीच्या इंदिरा गांधी चौकातून जात आहेत त्यामुळे सायंकाळी एक तास झाला तरीही वाहतूक कोंडी थांबली नव्हती.

## जागतिक बौध्द धम्म ध्वजाचे पाईक व्हा : प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर

**नवी मुंबई :**

जगातील दोनशे पेक्षा जास्त देशात बौध्द अनुयायी आहेत. त्यापैकी आठरा देशात हा धर्म प्रभावशाली आहे. बौद्ध धम्म ध्वजात पंचरंगाचे आचरण करणे प्रत्येक बौध्दाचे कर्तव्य आहे. जगभरात पूज्य असलेल्या बौद्ध धम्म ध्वजाचे पाईक व्हा, असा सल्ला प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी सीबीडी येथे बोलताना दिला.

सम्राट अशोक महाविहार संस्थेच्यावतीने सीबीडी येथील बौद्ध विहार प्रांगणात जागतिक बौध्द धम्म ध्वज दिनानिमित्ताने आखिल भारतीय भिक्खू संघाचे सदस्य भन्ते आर्यप्रज्ञा शाक्य यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या उपस्थितीत धम्म ध्वजारोहण झाला.

प्रारंभी, आर्य प्रज्ञा शाक्य यांनी धम्म ध्वज गीत गाऊन धम्म ध्वजाचा इतिहास मांडला. धम्म ध्वजातील विविध पाच रंग हे शांती, उत्साह, धैर्य, शुध्दता आणि करुणेचे प्रतिक असल्याचे ते म्हणाले. नवी मुंबईतील विविध राजकीय पक्षात विखुरलेल्या बौध्दांनी एक होवून भगवान बुध्दाचा सदधम्म वाढवावा. सदधम्माचे आचरण करा आणि धम्मध्वजाचे पाईक व्हा, असा सल्ला प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी पुढे बोलताना दिला.

यावेळी नवी मुंबई झोपडपट्टी सेवा संघाचे नारायण वाघमारे, प्रजासबलीकरण महासभेचे बळीराम मोरे, पंढरीबुआ महाराज, सुधाकर सोनकांबळे, मराठवाडा सेवा संधाचे एन. एल. सुर्यवंशी, विकास सिरसाठ, किशोर शिंदे जे. डी. कसबे यासह धम्म उपासक उपस्थित होते.



## निवडक

### कळंबोलीतून एक जण बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली स्टील मार्केट परिसरातून एक व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना घडल्याने त्या व्यक्तीचा शोध



कळंबोली पोलीस करीत आहेत. मुकेश देवकीनंद वर्मा (वय ३८) असे त्याचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फूट, केस काळे पांढरे, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे काळे, मध्यम बांधा आहे. हा व्यक्ती कळंबोली स्टील मार्केट परिसरातून कोणास काही एक न सांगता कोठे तरी निघून गेला आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे क्र. ०२२–२७४२३००० किंवा ८१६९५०७०३७ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रवासादरम्यान मोबाईलची चोरी

**पनवेल :** रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल चोरी झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये ई मेलद्वारे तक्रार करण्यात आली आहे. केरळ येथील रहिवासी निखिल बालक्रिष्ण हे मत्स्यगंधा एक्स्प्रेसने ठाण्यात येत असताना पहाटे पावणेसहा वाजता चोरट्यांनी त्यांच्या खिशातील मोबाइल चोरून नेला. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये ई मेलद्वारे तक्रार केली असून, पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### शॉटसर्किटमुळे कार जळाली

**पनवेल :** भिंगारी येथील एचपी पेट्रोलपंपाजवळ एका महिंद्रा एक्सव्ही गाडीला शॉटसर्किटमुळे अचानकपणे आग



लागल्याची घटना रविवारी (दि. ८) दुपारी १च्या सुमारास घडली आहे. पळस्पे बाजूकडून पनवेल बाजूकडे जाणाऱ्या रस्तावरून सिल्वर रंगाची महिंद्रा एक्सव्ही गाडी (एमएच ०४ एफएफ ९३२९) घेऊन दोघेजण येत होते. या वेळी अचानकपणे गाडीच्या बोनेटमधून धूर येऊ लागल्याने त्यांनी त्यांच्या ताब्यातील गाडी एचपी पेट्रोलपंपा जवळ उभी केली व मॅकेनिकला बघण्यासाठी ते दोघे गाडी बाहेर पडताच गाडीने अचानकपणे पेट घेतला. आजुबाजूच्या नागरिकांनी गाडीला लागलेली आग विझवण्यासाठी तेथे धाव घेतली. काहींनी वाहतूक शाखेचे पोलीस तसेच अग्निशमक दलाला कळवले. त्यांची पथके घटनास्थळी दाखल होताच शर्तीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत गाडीचे पूर्णतः नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही आहे.

# सीकेटी विद्यालयामध्ये एकात्मतेचे दर्शन

## वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी उधळले कलागुणांचे रंग





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम विभागाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातर्फे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका संध्या अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा अतिशय उत्साहवर्धक वातावरणात विद्यालयाच्या प्रांगणात शनिवारी (दि. ७) झाला.

वार्षिक स्नेहसंमेलनात शाळेतील बालकलाकारांनी 'ऐक्यम'च्या धरतीवर एकात्मता दर्शवत गणेशवंदना, देशभक्ती गीत, लावणी, कोळीगीत आदी विविध गाण्यांवर आपल्यातील कलागुणांचे रंग उधळीत नृत्य सादर करत पालकांसह प्रेक्षकांची प्रचंड दाद मिळवली. या वेळी मुलांनी सादर केलेले कार्यक्रम पालकांसह उपस्थितांचे आकर्षण ठरले.

या वेळी वर्षा ठाकूर, सिताराम मोहिते, प्रतिक ठाकूर यांनीसुद्धा मुलांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. मुलांनी आपल्यातील उपजत कलागुणांना विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत, त्याचे सादरीकरण करावे, त्यामुळे बौद्धिक आणि शारीरिक स्वास्थ्य सुदृढ राखण्यात यशस्वी व्हाल, असा मोलाचा सल्ला दिला.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळांतर्गत वर्षभरात घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा तसेच तालुका, जिल्हा, विभाग, राष्ट्रीय स्तरातील कला व सांस्कृतिक कार्यक्रमात यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पदक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था कार्यकारी सदस्य वर्षा ठाकूर सह प्रमुख अतिथी म्हणून पनवेल पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी सिताराम मोहिते, कन्सल्टिंग पेडीट्रीशन आणि निनोलॅजिस्ट डॉ. स्वाती लिखिते, संस्था संचालक मंडळ सदस्य प्रतिक ठाकूर, माजी नगरसेविका सुशिला घरत व वृषाली वाघमारे तसेच विशेष अतिथी म्हणून शाळेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी उपमहापौर चारुशीला घरत, कमळाकर घरत, नवनाथ साबळे संस्था सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, यांच्यासह माध्यमिक इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, ज्युनिअर कॉलेज मुख्याध्यापक प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभाग पर्यवेशिका आधूरी नीरजा, इंग्रजी पूर्व प्राथमिक पर्यवेक्षिका संध्या अय्यर, इंग्रजी प्राथमिक मुख्याध्यापिका निलिमा शिंदे आदी उपस्थित होते.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विशेष कौतुक

**कार्यक्रमात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात सीकेटी विद्यालयाप्रती असलेली विद्यार्थ्यांची आणि पालकांची ओढ पाहून समाधान व्यक्त केले. यासोबतच 'सीकेटी'चा नावलौकिक जगभरात पसरविणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.**



## गाड्यांची जाळपोळ करणारा माथेफिरू अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात सात वाहनांची जाळफळ करणाऱ्या माथेफिरूला अखेर पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. धर्मेंद्र गोळे असे या आरोपीचे नाव असून पोलीस त्याची कसून चौकशी करत आहेत. त्याने लावलेल्या आगीत ट्रॅक्टर, दुचाकी, आणि रिक्षा जळाली आहे.

पनवेल शहरातील सप्तगिरी बार समोरील दोन मोटरसायकल आणि पटेल हॉस्पिटल शेजारी पार्क केलेल्या तीन मोटारसायकली, जोशी आळीमध्ये एक रिक्षा व फडके नाट्यगृहासमोरील एक ट्रॅक्टर ही वाहने अज्ञाताने शनिवारी जाळली होती. त्यानुसार शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके ठिक–ठिकाणी रवाना करण्यात आली. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे या आरोपीचा शोध घेतला असता त्याला पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून अटक करण्यात आली आहे. धर्मेंद्र गोळे असे त्याचे नाव आहे. त्यांने गाड्या का जाळल्या व त्याच्याकडे ज्वलनशील पदार्थ कुठून आला याची चौकशी शहर पोलीस करत आहेत. प्राथमिक चौकशीत आरोपी हा मनोरुग्ण असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात कामोठे मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात अशाच प्रकारे गाड्यांना आग लावण्यात आली होती.

# करंजा मच्छीमार संस्थेच्या अध्यक्षपदी प्रदीप नाखवा

## उपाध्यक्षपदी राजेंद्र कोळी; मान्यवरांकडून अभिनंदन







**उरण : वार्ताहर**

राज्यातील सर्वात मोठ्या असलेल्या करंजा मच्छीमार सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी प्रदीप नाखवा व उपाध्यक्षपदी राजेंद्र कोळी यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी करंजा मच्छीमार सहकारी सोसायटीचे सदस्य राजेश नाखवा, ऋषीराज कोळी, गौरेश कोळी, अक्षय कोळी, ज्ञानेश्वर कोळी, बळीराम मसण, रॉबिन नाखवा, राजेंद्र नाखवा, मल्हार पाटील, मनोहर नाखवा, हर्षद कोळी, आदी उपस्थित होते. उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह यांनीहि अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

१७ संचालक संख्या असलेल्या या संस्थेच्या निवडणुकीत नऊ सदस्य बिनविरोध तर आठ सदस्य निवडून आले होते. यामध्ये दोन महिला संचालक सदस्यांचाही समावेश आहे. निवडणुकीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक जाहीर करण्यात आली होती. दरम्यान, दोन्ही पदासाठी प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. विरोधात एकही उमेदवार अर्ज दाखल झाला नसल्याने करंजा मच्छीमार सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी प्रदीप नाखवा तर उपाध्यक्षपदी राजेंद्र कोळी यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शिरीष सपकाळ यांनी दिली. राज्यातील सर्वांत मोठ्या असलेल्या करंजा मच्छीमार सहकारी संस्थेची वार्षिक उलाढाल ५० कोटींची आहे.





**पनवेल : खांदा कॉलनी येथे श्री संत वामनभाऊ व भगवान बाबा पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पोलीस ठाणे समोरील मैदानात या सोहळ्यानिमित्त ७ ते १४ जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी आष्टी (जि. बीड) येथील ह.भ.प प्रज्ञाताई ठोंबरे यांनी कीर्तन सादर केले. त्याअंतर्गत शनिवारी संत वामनभाऊ व भगवान बाबा सेवा मंडळ सल्लागार सीताताई पाटील यांनी भेट घेत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी हरिदास वनवे, सुनील खाडे, विनायक मुंडे, देविदास खेडकर, संजय वायभासे, दिलीप नाकाडे, दत्ता बिनवडे, शिवाजी लांब, बाळासाहेब बडे उपस्थित होते.**

## आयफोन खरेदीत एकाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

आयफोनचे वेड कोणाला नसते, मात्र हा आयफोन स्वस्तात खरेदी करण्याच्या नादात बनावट आयफोन पदरी पडल्याचा प्रकार खारघरमध्ये घडला आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर ओवे सेक्टर ३० येथील दिगंबर जगदाळे यांना मोबाईलची आवश्यकता असल्याने ते फेसबुकवर सर्च करत होते. या वेळी त्यांनी स्वस्तात आयफोन मिळत असल्याची जाहिरात वाचली, मात्र कुरिअरसाठी दोन हजार रुपये अगोदर भरावे लागेल, असे जाहिरातदाराकडून सांगण्यात आले. त्यासाठी एक क्यूआरकोड त्यांच्या मोबाईलवर पाठवण्यात आला. त्यानुसार दिगंबर यांनी दोन हजार रुपये पाठवत उर्वरित रक्कम फोन आल्यानंतर देतो, असे सांगितले. काही दिवसांनी कुरियर बॉयने त्यांचे कुरिअर आणून देत त्यांच्याकडून उर्वरित ३८ हजार गुगल पेद्वारे घेतले. कुरियर रुपये बॉय गेल्यानंतर दिगंबर यांनी बॉक्स उघडला व मोबाईल चालू करून आयफोनमधील ॲप स्टोअर चालू करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते चालू झाले नाही. त्यामुळे हा ओरिजनल आयफोन नसल्याचे दिगंबर यांच्या लक्षात आले. या वेळी त्यांनी संबंधितांशी संपर्क साधत मोबाइलमधील समस्येची माहिती दिली.

या वेळी समोरून त्यांना समस्येचा व्हिडीओ बनवून पाठवण्यास सांगितले, मात्र त्यानंतर संबंधितांनी दिगंबर यांना टाळण्यास सुरुवात केली. आपली ४० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दिगंबर यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पनवेलमधील वकिली वर्गासाठीच्या व्याख्यानाला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महिला वकील वर्ग यांच्या वतीने शनिवारी (दि. ७) ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कपिकूल सिद्धीपिठम नाशिक श्री महंत तपोपूर्ती परमहंस सद्गुरु श्री वेणभारती महाराज यांनी या वेळी वकिली व्यवसायमधील ताणतणाव व सुंदर आयुष्य यामधील समन्व्य आणि वकिली व्यवसाय आणि नीतीमूल्य या विषयावर वकिली वर्गासाठी व्याख्यान सादर करण्यात आले. तसेच कृष्णमयी कपिकूल आश्रमाच्या उत्तर अधिकारी यांनी गुरुपरिचय कार्याची माहिती करून दिली.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. दीपाली बांद्रे व प्रास्ताविक ज्योती उरणकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये ॲड. अस्मिता भुवड, पौर्णिमा सुतार, आरती शेवडे, हेमा भगत, सीमा भोईर, प्रगती माळी यांनी केले. आयोजनाकरिता पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उपाध्यक्ष ॲड. संदीप जगे व त्यांचे कार्यकारी वकील मंडळ यांनीदेखील सहभाग घेतला. तसेच पनवेलचे ज्येष्ठ वकिल गुरुनाथ कडवे, राजेंद्र देशमुख, दीपक गायकवाड, ॲड नार्वेकर, भरत नवाळे, जे. डी. पाटील, प्रफूल म्हात्रे, अरविंद चामले, प्रदीप इंगोले यांचे सहकार्य लाभले.

प्रमुख वक्ते वेणाभारती रती महाराज यांनी त्यांच्या व्याख्यानामध्ये वकिलांना व न्यायाधीशांना व्यवसायामध्ये नीतीमूल्य कसे सांभाळावे. न्यायालय हे सर्व सामान्य माणसाला न्याय मिळण्याचे शेवटचे दार आहे. न्याय मागण्यासाठी आलेल्या व्यक्तीला मातृत्वाच्या भावनेने न्यायदान करा. प्रामाणिकपणा व्यवसाय करताना ठेवा. अशिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आग्रही धोरण ठेवून न्याय देण्याचा प्रयत्न करा. अशिलाची बाजू मांडणारा निस्वार्थी व्यक्ती अशी भावना ठेवून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करा. नातेसंबंधांमधील वाद सामोपचाराने मिटवण्याचा आग्रह धरा. पती पत्नीच्यामधील वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी त्यांना हे गाणं पक्षकारांना एकवा असे सांगितले ते गाणं डाव मांडून, सांडून, जाऊ नको डाव मोडू नको.. जेणेकरून अशिलांना स्वतः हाच्या चुकीची जाणीव होईल. समाज सुधारण्याचे हे कार्य भारतभर गेले २२ वर्ष ज्ञान दान करीत सद्गुरु वेणाभारती महाराज करीत आहेत.

कपिकूल आश्रम नाशिक येथे स्थापित करून योग, निसर्ग उपचार व्यख्यान आयोजित करून समाजसुधारणेचे कार्य करीत आहे. ७ जानेवारी रोजी पनवेल महिला वकील वर्ग यांनी व्याख्यानाचे आयोजन करून पनवेलचे समस्त वकील वर्ग, न्यायाधीश वर्ग, कायदे अभ्यासक व पनवेलकर नागरिकांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला भरगोस प्रतिसाद मिळाला.

ज्येष्ठ वकील राजेंद्र देशमुख, दीपक गायकवाड, चंद्रहास म्हात्रे, ॲड. प्रल्हाद खोपकर, अमित चव्हाण, ॲड. थळकर, शारदा पिंजारी, अविनाश भोईर, सुशांत घरत, विशाल मुंडकर, सुशील लाड, सुरज गोंधळी, कार्यक्रमाला उपस्थित पनवेल बार असोसिएशन पुरूष व महिला वकील वर्ग उपस्थित होते.



**कामोठे : सेक्टर ५ येथे शेतकरी गुळाचा चहा हे दुकान प्रवीण मुढे आणि रमेश मेटकरी यांनी सुरू केले आहे. या दुकानाचे उद्‌घाटन रविवारी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी प्रवीण मुढे आणि रमेश मेटकरी यांचे अभिनंदन करून यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप कामोठे उपाध्यक्ष रावसाहेब बुधे, माजी नगरसेवक विकास घरत तसेच गणेश बेरगळ, पप्पू देवडर, सचिन गावडे, बाबू केळकर, विक्रम देवदेकर, एन. डी. बुधे, विक्रम देवडेकर आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# बडबडीचे राजकारण

सध्या राज्यात बडबड करण्याचे राजकारण सुरू आहे, अशी टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी केली. वास्तवत: अवघ्या बडबडीचा मक्ता सत्ता हातातून निसटल्यामुळे नैराश्याने ग्रासलेल्या विरोधकांनीच सध्या घेतलेला दिसतो. सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकार मात्र शांतपणे राज्याच्या हिताचे निर्णय घेण्याचे काम करण्यात गुंतले आहे.

**सध्या राज्यात सुडाचे नव्हे तर बडबड करण्याचे राजकारण सुरू आहे अशी टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी एका कार्यक्रमात बोलताना केली. सकाळपासून माध्यमांमध्ये क्रिया-प्रतिक्रिया या पलीकडे काहीच दिसत नाही. राज्यासमोर अनेक प्रश्न असूनही राणे काय बोलले, राऊत काय बोलले हेच टीव्हीवर दाखवले जाते, अशी टीका राज ठाकरे यांनी केली. त्यामुळे मी आता काही बोलत नाही असे म्हणत त्यांनी स्वत:ही बातम्यांमध्ये हमखास झळकतील अशी काही विधाने केली, हा भाग अलाहिदा. पण त्यांची माध्यमांवरची उपरोक्त टीका समर्पक वाटावी इतक्या राजकीय विधानबाजीचा भडिमार रविवारी वृत्तवाहिन्यांवर दिसून आला. यात अर्थातच आघाडीवर होते शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत हेच. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा शिवरायांचा अवमान करण्याचा कुठलाही हेतू नव्हता याचा खुलासा होऊन तो विषय केव्हाचाच मागे पडला असला तरी पुन्हा पुन्हा तो उकरून काढण्याचा एककलमी कार्यक्रम सध्या राऊत यांनी चालवला आहे. त्यासंदर्भात बोलताना त्यांची जीभ रविवारी पुन्हा एकदा पातळी सोडून घसरली, परंतु राऊत यांच्या विधानांना कुणीही अगदी त्यांच्या मित्रपक्षांतील नेतेमंडळीही गांभीर्याने घेत नाहीत हेही तितकेच खरे आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार लवकरच कोसळणार, हे सरकार फेब्रुवारी महिना पाहणार नाही, अशी वक्तव्ये करण्याचा सपाटा राऊत यांनी सध्या लावला आहे. असाच दावा त्यांनी रविवारी पुन्हा केला, परंतु त्यांच्या या विधानाची खिल्ली अन्य कुणी नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सुद्धा उडवलेली रविवारी दिसून आली. संजय राऊत यांचे यासंदर्भात काही नियोजन असेल तर त्याबद्दल मला फारशी काही माहिती नाही. मुंबईला गेल्यावर त्यांच्याकडून मी जाणून घेईन अशी मिश्किल टिप्पणी पवार यांनी केली. अर्थात, सत्ता हातात असताना पाय जमिनीवर ठेवून काम करायचे असते असे टीकात्मक विधान स्वत: पवार यांनीही या वेळी केले. सहसा कधीही राजकीय विधानबाजीची दखल न घेणाऱ्या व निव्वळ कामावर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवारसाहेबांचा उल्लेख न करता, आम्ही जमिनीवर आहोत आणि जमिनीवरच राहणार आहोत, असे प्रतिपादन मग औरंगाबादेतील डवांटेज महाराष्ट्र एक्सपोच्या समारोपप्रसंगी केले. फडणवीस यांची कार्यशैली जवळून पाहणारे सारेच त्यांच्या या वक्तव्याला दुजोरा देतील. विधानबाजीने अजिबात विचलित न होता निव्वळ राज्याच्या हिताच्या योजनांवर लक्ष केंद्रित करून अफाट वेगाने सुयोग्य निर्णय घेत राहणे हीच फडणवीस यांची कार्यशैली सहजपणे दिसून येते. त्यामुळे राज ठाकरे यांनी उल्लेखलेल्या बडबडीच्या राजकारणातून फडणवीस यांचे नाव निश्चितपणे वगळावे लागेल. दखल घेण्याजोगे असल्याखेरीज फडणवीस कधीही कुणाच्या बाष्कळ विधानाकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळेच शिंदे-फडणवीस सरकार शांतपणे आपले काम करीत टिकून राहणार हे महाराष्ट्राची जनताही निश्चितपणे जाणून आहे.**

# कर्जत तालुक्यातील भातशेतीला हवी उभारी





**खबरबात**
**विजय मांडे**

आपला देश कृषी प्रधान देश आहे. त्यातच रायगड जिल्हा पूर्वी 'भाताचे कोठार' म्हणून ओळखले जायचे. कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी दुबार भात शेती केली जाते. विशेष म्हणजे राजानाला विभागातील भात शेतीमध्ये विविध प्रयोग केले जातात, मात्र दहा-बारा वर्षांपूर्वी राजनाल्यातील कालव्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती केली. त्यानंतर सारे काही विस्कळीत झाले आणि दोन-तीन वर्षे कालव्यात पाणीच आले नाही तसेच भात बियाणांची टंचाई, हमी भाव भात खरेदी केंद्रामधील अडचणी त्यातच लहरी हवामान या सर्व गोष्टींमुळे कर्जत तालुक्यातील शेतकरी कंटाळला असून भात शेती करायची की नाही? या निर्णयापर्यंत शेतकरी बांधव आले आहेत.

माजी खासदार भाऊसाहेब राऊत, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब आरेकर, माजी सभापती रामचंद्र शितोळे आदींनी पाठपुरावा केल्यामुळे राजनाला प्रकल्प अस्तित्वात आला. राजनाला डाव्या कालव्याचे सिंचन १९५९-६०पासून सुरू आहे. तर राजनला उजवा कालवा व पाली पोटल कालव्याचे काम १९७२-७३ला पूर्ण झाले तर १९७४ मध्ये यामधूनही सिंचनास सुरुवात झाली. राजनाला डाव्या कालव्याची लांबी २१ किलोमीटर आहे. यामध्ये ३५ गावे समाविष्ट असून सिंचन क्षेत्र १८०० हेक्टर तर राजनाला उजवा कालव्याची लांबी ७.७० किलो मीटर असून चार गावे सामाविष्ट असून सिंचन क्षेत्र ४०० हेक्टर आहे. पाली पोटल ९.८० किलोमीटर असून सहा गावांचा समावेश आहे. तर सिंचन क्षेत्र ३४२ हेक्टर इतके आहे. राजनाला भागात भात पीक इतके भरघोस येत असे की, लक्ष्मीकांत तथा बाळ दळवी, माजी सभापती तानाजी चव्हाण, गोपीनाथ चव्हाण, यशवंत गायकवाड, चंद्रकांत कडू आदींनी राजनाला बीजोत्पादन सहकारी संस्था स्थापन करून चांगल्या प्रतीचे भात बियाणे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्याला माजी आमदार सुरेश लाड यांनीही भूमिका बजावली होती. त्यानंतर अशोक भोपतराव, समीर देशमुख, चंद्रकांत मांडे आदी त्यामध्ये सहभागी झाले. सध्या तानाजी चव्हाण या संस्थेचे अध्यक्ष आहेत. ही संस्था अद्यापही सक्रिय आहे, मात्र दोन – तीन वर्षांपासून बीजोत्पादन करण्यात येत नाही.

फार पूर्वी बांधण्यात आलेला राजनाल्याचे बांधकाम मातीत होते, मात्र तरीसुद्धा शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहोचून सर्व क्षेत्र ओलिताखाली येत होते. दहा – बारा वर्षांपूर्वी तब्बल ७० कोटी पेक्षा अधिक निधी खर्च करून या राजनाल्याचे बांधकाम सिमेंट क्राँक्रिटमध्ये करण्यात आले, मात्र काम तंत्रशुद्ध पद्धतीने केले नसल्याने काही भागात मुख्य नाला खाली तर त्याला जोडणारे उपनाले तथा कालवे वर बांधले गेले परिणामी पाणी कसे वाहणार? तसेच नाल्याची दुरुस्ती, साफसफाई वेळेवर केली जात नसल्यानेही पाणी वाहण्यास अडथळा होतो.

कर्जत तालुक्यातील दुबार भात शेतीसाठी राजनाला हा वरदान ठरत आहे, मात्र मागील काही वर्षांपासून नाल्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याने पाणी वाहण्यास अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे राजनाल्याला पाणी सोडायचे असल्यास प्रथम राजनाल्याची डागडुजी करणे अतिशय गरजेचे आहे. तालुक्यातील दुबार भातशेती साठी राजनाला कालव्यातून दरवर्षीप्रमाणे १५ डिसेंबरला पाणी सोडण्यात येते आणि १५ एप्रिलला बंद करण्यात येते, मात्र मुख्य राजनाला कालव्याची पडझड झाल्याने आणि कालव्याच्या उपकालव्यांचे काम तंत्रशुद्ध पद्धतीने न झाल्याने हे पाणी सर्व गावापर्यंत पोहचत नाही. पावसाळ्यात सुद्धा राजनाल्याची योग्य डागडुजी न केल्याने पावसाळ्यात डोंगर कपारीतून येणारे पाणी राजनाल्याच्या खालून जाणाऱ्या मार्गाची सफाई न केल्याने ते पाणी त्या मार्गाने न जाता ते वरून जाते. त्यामुळे भातपीक वाहून जाण्याच्या घटना घडत असून शेतकऱ्यांचे खूप नुकसान होते.



दुरुस्तीच्या वेळी दोन वर्षे पाणी न सोडल्याने शेतकरी दुबार भात शेती पिकवू शकले नाहीत. त्या उलट काहींनी कडधान्य तर काहींनी भाजी पाल्यासारखी नगदी पिके घेण्यास सुरुवात केल्याने ही पिके भात पिकापेक्षा कमी मेहनतीची व कमी खर्चिक आणि कमी पाणी लागणारी असल्याने आजही ती पिके घेण्यासाठी शेतकरी वर्गाचा कल जास्त आहे, मात्र काही शेतकरी भात पीक न घेता जमिनी ओसाड ठेवतात. त्यामुळे पिकाचे नुकसान होतेच शिवाय जमिनीचेही न भरून येणारे नुकसान होते.

कालांतराने त्या जमिनीची पूर्ण वाताहत होते. त्यातूनही पिकवलेले भात हमी भाव खरेदी केंद्रावर नेल्यावर तेथे रांगा लावाव्या लागतात. तर हमालीचे पैसे रोख द्यावे लागतात तसेच दुबार भात शेतीसाठी चांगले बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. कारण उशिरा बियाणे मिळाल्यास जून महिन्यातील पाऊस उभे पीक जमीनदोस्त करील. याची भीती आहे. खरे तर आशिया खंडातील एकमेव भात बियाणे पैदास करणारे कोंकण कृषी विद्यापीठाचे प्रादेशिक कृषी केंद्र कर्जतमध्ये आहे. तसेच तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तित्वात आहे. तरीही या तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांना बियाणे मिळविण्यासाठी धडपड करावी लागत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्ट फोन चार्ज करताना 'या' पाच चुका टाळा

आजच्या काळात स्मार्टफोनशिवाय कुठलेही काम करणे अवघड झाले आहे. आज मोबाईल बहुतांश कामांमध्ये वापरला जातो, मात्र कालांतराने त्याची बॅटरी खराब होते. बहुतांश स्मार्टफोन्समध्ये डळ-खेप (Lithium Ion) बॅटरी वापरल्या जातात. या बॅटरीज साधारणपणे ३०० ते ५०० चार्ज अथवा डिस्चार्ज सायकलसह येतात.



यानंतर बॅटरीची लाईफ कमी होण्यास सुरुवात होते. याच बरोबर त्यांची कॅपॅसिटीही कमी होऊ लागते. अर्थात फुल चार्ज झाल्यानंतरही बॅटरी पूर्णपणे काम करणार नाही. यासंदर्भात, बॅटरी चार्ज करताना कोणत्या चूक करू नये, हे आम्ही आपल्याला सांगत आहोत.

**नेहमी-नेहमी बॅटरी चार्जिंग अलर्टची वाट पाहू नका –** अनेक युजर्स फोनकडून अलर्ट मिळाल्यानंतरच बॅटरी चार्चसाठी लावतात. पण नेहमीच बॅटरीचे चार्जींग संपण्याची वाट पाहू नका. फोनकडून अलर्ट मिळण्यापूर्वीच फोन चार्जला लावा. फोन एकाच वेळी पूर्ण चार्ज होण्यापूर्वीही पॉवर प्लगपासून डिस्कनेक्ट केला जाऊ शकतो.

**ऑफिशियल चार्जरचाच वापर करा –** मोबाईल चार्ज करताना मोबाईलसोबत येणाऱ्या ऑफिशियल चार्जरचाच वापर करायला हवा. मात्र, ओरिजनल चार्जर नसेल तर, कंपॅटेबल चार्जरचा वापर केला जाऊ शकतो. मात्र, सातत्याने दुसरे चार्चर वापरल्यास आपल्या फोनची बॅटरी खराब होऊ शकते.

**सॉकेटमधून चार्जर काढत जा –** बॅटरी फुल चार्ज झाल्यानंतर, नवे स्मार्टफोन चार्ज होणे बंद होते. मात्र, याचा अर्थ चार्जरही काम करणे बंद करते असे नाही. याच बरोबर मोबाईल चार्ज करताना मोबाईल फोनचा वापर करू नका. यामुळे बॅटरी चार्ज होण्यास उशीर लागतो. डिव्हाईसच्या बॅटरीवर याचा परिणाम होतो.

**बॅटरी चार्ज करताना फोनचा वापर करू नका –** मोबाईल फोन चार्ज करताना वापरू नका. महत्वाचे म्हणजे मोबाईल चार्ज करताना त्यावर गेम खेळू नका अथवा व्हिडिओही बघू नका. यामुळे बॅटरी फुल कॅपिसिटीने चार्ज होत नाही. याचा परिणाम बॅटरीच्या लाईफवरही होतो.

**यामुळेही डॅमेज होते बॅटरी –** टेम्परेचरचाही बॅटरीवर मोठा परिणाम होत असतो. हाय टेम्परेचरमुळे बॅटरीवर अधिक स्ट्रेस येतो. यामुळे तिची कॅपेसिटी लवकर कमी होते. यामुळे आपला फोन अधिक गरम असलेल्या रूममध्ये चार्जला लावू नका.

# ...म्हणून साजरा होतो प्रवासी भारतीय दिन



**निमित्त**

भारतामध्ये मोठ्या संख्येने लोक शिक्षणासाठी तसेच नोकरी व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये गेलेले आहे. त्यातील बरेच भारतीय तिथेच स्थायिक झालेले आहेत. या भारतीयांनी या देशांमध्ये राहताना आपली प्रगती करून घेतलीच, पण त्याचसोबत ते राहत असलेल्या देशांच्या विकासामध्ये मौलिक योगदान दिले आहे. अशा जगभरात पसरलेल्या अनिवासी भारतीयांना आपला मूळ देश असलेल्या भारताशी जोडून घेण्यासाठी एक नवा विचार पुढे आला. त्यातूनच प्रवासी भारतीय दिन या संकल्पनेचा जन्म झाला.

भारत सरकारकडून दरवर्षी ९ जानेवारी हा दिवस प्रवासी भारतीय दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला प्रवासी भारतीय दिवस ९ ते ११ जानेवारी या कालावधीत २००३ साली साजरा करण्यात आला होता. भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कल्पनेतून या दिवसाची सुरूवात करण्यात आली. आपल्या देशातून अन्य देशात गेलेल्या भारतीय लोकांनी आपल्या मूळ भूमीशी आणि संस्कृतीशी जोडले जावे, त्यांच्याशी असलेले संबंध अधिक दृढ व्हावेत, हा या मागील हेतू होता.

प्रवासी भारतीय दिनी विदेशात राहून विविध क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या भारतीयांना प्रवासी भारतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. विदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या मनात भारताविषयी काय भावना आहे. जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारताने आणखी काय करायला हवे, भारत आणि इतर देश यांच्यामध्ये काय समान धागे आहेत, अशा अनेक गोष्टींचे वैचारिक आदान प्रदान व्हावे, त्यासाठी हे प्रवासी दिन हे व्यासपीठ आहे. यामध्ये विशेषत: तरुण वर्गाला अनिवासी भारतीयांकडून मार्गदर्शन केले जाते. विदेशातील नव्या संधींबद्दल यांना माहिती मिळते. अनिवासी भारतायींच्या माध्यमातून भारतात नवी व्यावसायिक गुंतवणूक आकर्षित करण्याचाही प्रयत्न केला जातो. प्रवासी भारतीय दिन सुरू करण्याचे श्रेय लक्ष्मीमल सिंघवी समितीला जाते. भारत सरकारकडून प्रवासी भारतीय पुरस्कार दिला जातो. विदेशात उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जातो. भारतीय लोक विदेशात मोठ्या संख्येने स्थायिक होत आहेत. आता जग हे आधुनिक वाहतूक आणि दूरसंपर्क यंत्रणांनी जोडले गेले आहे. असे असतानाच भारतात अजून बर्याच पायाभूत सुविधांची गरज आहे. भारत खेड्यांचा देश आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही खेडोपाडी वसलेली आहे. त्या सगळ्यांपर्यंत अजून बर्याच पायाभूत सुविधा पोहचण्याची गरज आहे.

भारताचे पंतप्रधान जेव्हा विदेशी दौऱ्यावर जातात, तेव्हा तेथील भारतीयांना भेटत असतात. नरेंद्र मोदी जेव्हा भारताचे पंतप्रधान झाले तेव्हा अनिवासी भारतीय आणि भारत यांच्यामध्ये जास्तीत जास्त संबंध येण्यासाठी तसेच विदेशातील भारतीयांना भारताशी जोडण्यासाठी मोठा प्रयत्न करण्यात आला. त्यातून हाऊडी मोदी यासारख्या मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातून मोदींनी अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना प्रभावीत केले होते. मोदींना पंतप्रधान झाल्यानंतर जगातील अनेक देशांचे दौरे केले. त्यांनी तिथे राहणार्या भारतीयांचे मोठे मेळावे घेतले. त्यात त्यांना मोठा प्रतिसाद मिळतो.

**(साभार : माय महानगर)**

## क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : मावळतीच्या वेळी क्षितिजावर दूरवर समुद्रात विहार करणारी होडी आणि अथांग पसरलेल्या दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील अप्रतिम सूर्यास्त न्याहाळताना पर्यटकांचे टिपलेले विलोभनीय दृष्य.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# कडक गरम पाण्याने अंघोळ करण्याचे दुष्परिणाम

सध्या सगळीकडे कड्याक्याची थंडी पडत आहे, या ऋतूत अंथरुणावर बसून चहा, कॉफी पिण्यासोबत गरम पाण्याचा शॉवर घेण्याचा आनंद वेगळाच असतो. हिवाळ्यात आपण सर्वच आंघोळीसाठी जास्त गरम पाण्याचा वापर करतो, पण अंघोळीनंतर अंगावर खाज येणे, जळजळ होणे, पिंपल्स आणि केस गळणे या समस्यांना समोर जावे लागते वास्तविक, सामान्यपेक्षा जास्त गरम पाण्याने आंघोळ करणे हानिकारक ठरू शकते तसेच, त्वचा आणि केसांच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. या हिवाळ्यात तुम्हीही गरम पाण्याच्या आंघोळीचा आनंद घेत असाल तर त्याचे काही दुष्परिणामदेखील जाणून घ्या.



**असा होऊ शकतो परिणाम?**

**डोळ्यांच्या आर्द्रतेवर परिणाम होऊ शकतो–** गरम पाण्याने अंघोळ केल्याने डोळ्यातील आर्द्रतेवर परिणाम होतो, त्यामुळे डोळ्यांना खाज येणे, कोरडेपणा, लालसरपणा यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. कोरड्या डोळ्यांची समस्या असल्यास गरम पाण्याने अंघोळ अजिबात करू नये. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, डोळ्यांतील कोरडेपणाची समस्या दूर करण्यासाठी थंड पाण्याने आंघोळ करणे खूप फायदेशीर ठरते.

**प्रजनन क्षमतेवर नकारात्मक परिणाम–** हे थोडे विचित्र वाटेल, परंतु वारंवार गरम पाण्याचा शॉवर घेतल्याने प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. जर तुम्हाला गर्भधारणा करायची असेल तर आंघोळ करताना गरम पाणी टाळावे. दररोज गरम पाण्याने आंघोळ केल्याने पुरुषांची प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या प्रभावित होऊ शकते.

**केस आणि त्वचेसाठी हानिकारक–** गरम पाणी केसांसाठी खूप धोकादायक ठरू शकते, कारण गरम पाण्यामुळे केसांमधील केराटिन पेशी कमकुवत होतात आणि त्यावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे केस पातळ होतात, कमकुवत होतात आणि गळू लागतात. केसांसाठी कोमट पाणी कोणते आहे. गरम पाण्याने चेहरा धुणे देखील योग्य नाही, कारण यामुळे त्वचेच्या संरक्षणात्मक थरावर परिणाम होतो, त्वचा कोरडी होते आणि मुरुम येऊ शकतात.

**त्वचेशी संबंधित समस्या वाढू शकतात–** गरम पाण्याचा आंघोळ केल्याने त्वचा कोरडी होते, त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. तुम्ही अनेकदा लक्षात घेतले असेल की गरम पाण्याने आंघोळ केल्यावर त्वचेला खाज सुटणे, लालसरपणा, कोरडेपणा आणि चिडचिड जाणवू लागते. खूप गरम पाण्याने आंघोळ करू नये. थंडीत आंघोळीसाठी कोमट पाणी वापरू शकता.

# कार्यकर्त्यांनी जनतेच्या संपर्कात रहावे : राजेश मपारा

## संचालक जनार्दन कंधारे, विनोद भगत यांचा भाजपतर्फे सत्कार

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या समस्या सोडवण्याकडे अधिक लक्ष केंद्रित करावे. पक्ष आपणास निश्चित बळ देणार असून सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामास लागावे व पक्षाला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे प्रतिपादन दक्षिण रायगडचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष व अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे संपर्क प्रमुख राजेश मपारा यांनी केले आहे.



ते पुढे म्हणाले, मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघात भारतीय जनता पार्टीचे दोन संचालक निवडून येऊन एक चांगली सुरुवात मुरुडमध्ये झाल्याचा आनंद होत आहे. तसेच आता आगामी नगरपरिषद व जिल्हा परिषद निवडणूक जवळ आल्या आहेत. त्यासंदर्भात नियोजन करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते जनार्धन कंधारे व तालुका उपाध्यक्ष विनोद भगत हे मोठ्या मताधिक्याने विजयी होऊन संचालक झाले आहेत.त्यांचा सत्कार समारंभ आज मुरुड शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात झाला. यावेळी ते मार्गदर्शन भाषणात बोलत होते.

यावेळी भाजप नेते अॅड. महेश मोहिते, मुरुड तालुका भाजप अध्यक्ष महेंद्र चौलकर, तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, शैलेश काते, महेश मानकर, मुरुड शहर अध्यक्ष उमेश माळी, नैनिता कर्णिक, प्रवीण बैकर, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, तालुका सचिव नरेश वारगे, प्रतिभा गायकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, मुरुड तालुका सरसचिटणीस सुदामा वाघीलकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात सुपारी संघाचे संचालक जनार्धन कंधारे व विनोद भगत याना जिल्हा उपाध्यक्ष व ऍड महेश मोहिते यांच्या शुभ हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन गौरवण्यात आले.

# घे भरारी अभियानाला प्रतिसाद १४ जानेवारीला होणार सांगता



**पेण : प्रतिनिधी**

१० वर्षांपूर्वीच्या निर्भया प्रकरणानंतर जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण, रायगड येथे महिला अत्याचार मंचाची स्थापना झाली. या मंचामार्फत आता विविध वाड्यांवर व संस्थामध्ये दुर्लक्षित मुली व महिलांकरीता 'घे उंच भरारी 'हे अभियान राबविण्यात येत आहे.

संक्रात जवळ येत असतानाच समाज परिवर्तन हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सामाजिक क्षेत्रातील तरूणाई जोमाने जागृती अभियानात रंगली आहे. गेल्या सप्ताहात सावित्रीबाई फुलेच्या जयंतीपासून घेतलेला वसा पुढे चालू आहे.

वरवणे, सावरसई येथिल शासकीय आश्रम शाळात व आई डे केअर, चाईल्ड हेवन येथे अंकुर ट्रस्ट व मंचाच्यावतीने ' बालविवाह 'बाबत जनजागरण करण्यात येत आहे. यामध्ये केवळ कायदा सांगून नव्हे तर रोजच्या जगण्यात येणारे प्रश्न जोडुन परिणाम साधण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. या अभियानाची सांगता १४ जानेवारी रोजी होणार आहे.

या बाबत विविध प्रशिक्षण, संघर्षमय जीवन जगणाऱ्याच्या वैयक्तिक प्रश्नांची उकल, एकल महिलांना आधार या सर्व बाबींचा सामाजिक स्तरावर विचार विनिमय करण्यात सध्या मंचाचे तरूण स्वयंसेवक आघाडीवर आहेत, अशी माहिती समन्वयक कविता पाटील यांनी दिली.

# रेल्वे ब्लास्टमधील पिडीतांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत



**कर्जत, मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक जवळील वावरले - वडविहीर येथे रेल्वेच्या कामासाठी करण्यात येणाऱ्या ब्लास्टिंगचा २३ डिसेंबरला स्फोट होऊन दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यावेळी स्थानिक नागरिकांचा मोठा उद्रेक झाला होता. त्यामध्ये मृत झालेल्या माय-लेकाच्या कुटुंबियांना आमदार महेंद्र थोरवे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे ५० लाख रुपयांचा मदत निधी मिळाला आहे.

वावरले-वडविहीर येथे रेल्वेच्या कामासाठी करण्यात येणाऱ्या ब्लास्टिंगचा स्फोट होऊन दोन जणांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. नुकसानभरपाई देण्यास नकार देणाऱ्या ठेकेदारासह संबंधित दोषींवर पोलिसांनी कारवाई केली होती. या दुर्घटनेत कर्जत तालुक्यातील किरवली येथील देवाकाबाई बडेकर (आई) सचिन बडेकर (मुलगा) या दोघांना नाहक जीवाला मुकावे लागले असताना या कुटुंबाचा आधारच हरवल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**मी कायमचा या कुटुंबाच्या सोबत असून जे जे करता येईल ते ते आमदार म्हणून नाही तर एक भाऊ म्हणून या कुटुंबाला कायमच सहकार्य करणार आहे.**
**-महेंद्र थोरवे, आमदार**

नागपूर अधिवेशन संपवून आमदार महेंद्र थोरवे यांनी तातडीने या कुटुंबाची भेट घेऊन कुटुंबाला मदतीचा शब्द दिला होता. त्यानंतर रेल्वेच्या ठेकेदार आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून बडेकर कुटुंबाला ५० लाख मदतीचा धनादेश दिला.

# यशवंतराव घाडगे यांचा आज माणगावात जयंती समारंभ

**माणगांव : प्रतिनिधी**



शहीद विर यशवंतराव घाडगे व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक (मरणोत्तर) यांची जयंती समारंभ सोमवार ९ जानेवारी रोजी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग,माणगाव यांच्या कार्यालयासमोरील प्रांगणात सकाळी ७ वाजल्यापासून साजरा होणार आहे.

या जयंती समारंभाचे अध्यक्षस्थान घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगांव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी हे भूषविणार आहेत. यादिवशी सकाळी ७:३० वाजता मैदानावर एकत्र येणे, सकाळी ८ ते ८:१० वाजता ध्वजारोहण, पोलीस सलामी व राष्ट्रगीत, सकाळी ८:१० ते ८:२५ वाजता शहिद वीर यशवंतराव घाडगे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणे, सकाळी ८:२५ ते ८:३० वाजता पोलीस विभागाकडून मानवंदना,सकाळी ८:३५ ते ८:४० वाजता दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन, सकाळी ८:४० ते ८:४५ वाजता स्वागतगीत,सकाळी ८:४५ ते ८:५० वाजता प्रास्ताविक, सकाळी ८:५० ते ९ वाजता सेना दलातील मान्यवरांचे स्वागत, सकाळी ९ ते ९:२५ वाजता अतिथींचे मनोगत, सकाळी ९:२५ ते ९:३० वाजता आभार प्रदर्शन अशी कार्यक्रमाची रूपरेषा आयोजित करण्यात आली आहे.

समारंभास नागरीकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे अवाहन घाडगे उत्सव समितीच्या सचिव तथा माणगांव तहसिलदार प्रियांका आयरे व माजी सैनिक संघटना माणगांव अध्यक्ष विष्णू सावंत यांनी केले आहे.


रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सत्यमेव जयते

सी.जी.-डी.एल.-अ.-06122022-240825
CG-DL-E-06122022-240825

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 5320] नई दिल्ली, बुधवार, नवम्बर 30, 2022/अग्रहायण 9, 1944
No. 5320] NEW DELHI, WEDNESDAY, NOVEMBER 30, 2022/AGRAHAYANA 9, 1944

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

नई दिल्ली, 30 नवम्बर, 2022

**का.आ. 5552(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH166F के कि.मी. 0 से कि.मी. 23.447 (उपविभागीय अधिकारी कार्यालय महाड) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् उपविभागीय अधिकारी महाड को लिखित रूप मे प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH166F के कि.मी. 0 से कि.मी. 23.447 (उपविभागीय अधिकारी कार्यालय महाड) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।

| राज्य का नाम: महाराष्ट्र जिले का नाम: रायगड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: महाड | | | | | |
| गांव का नाम: नांदगाव खुर्द | | | | | |
| 1 | 556 | निजी | शुष्क | 0.0160000 (हेक्टेयर) | 0.0160000 |
| गांव का नाम: वालसुरे | | | | | |
| 1 | 155/1 | निजी | शुष्क | 0.2255000 (हेक्टेयर) | 0.2255000 |
| 2 | 155/15 | निजी | शुष्क | 0.1310000 (हेक्टेयर) | 0.1310000 |
| 3 | 26/0 | निजी | शुष्क | 0.0550000 (हेक्टेयर) | 0.0550000 |
| गांव का नाम: वरंडोली | | | | | |
| 1 | 264 | निजी | शुष्क | 0.0010000 (हेक्टेयर) | 0.0010000 |
| | | | कुल | 0.4285 | 0.4285 |

[फा. सं. RW/NH-12014/152/2017-MAH-Zone IV/3A]
राजेश गुप्ता, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

New Delhi, the 30th November, 2022

**S.O. 5552(E).**—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH166F in the stretch of land from Km 0 to Km23.447 (Sdo Office mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub divisional Officer Mahad in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH166F in the stretch of land from NH166F (Sdo Office mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA.

| State: MAHARASHTRA District: RAIGAD | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Mahad | | | | | |
| Village: Nandgaon Khurd | | | | | |
| 1 | 556 | Private | Dry | 0.0160000 (Hectare) | 0.0160000 |
| Village: Valsure | | | | | |
| 1 | 155/1 | Private | Dry | 0.2255000 (Hectare) | 0.2255000 |
| 2 | 155/15 | Private | Dry | 0.1310000 (Hectare) | 0.1310000 |
| 3 | 26/0 | Private | Dry | 0.0550000 (Hectare) | 0.0550000 |
| Village: Warandoli | | | | | |
| 1 | 264 | Private | Dry | 0.0010000(Hectare) | 0.0010000 |
| | | | Total | 0.4285 | 0.4285 |

[F. No. RW/NH-12014/152/2017-MAH-Zone IV/3A]
RAJESH GUPTA, Director

# जाहीर सूचना

सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की. राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ फ चे रुंदीकरण करण्यासाठी महाड तालुक्यातील मौजे नांदगाव खु., वाळसूरे व वरंडोली या गावातील जमिन संपादीत होत आहे. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना हिंदी व इंग्रजी मध्ये भारत राजपत्रात दिनांक ३०/११/२०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

स्थळ :- महाड
दिनांक :- ०३/०१/२०२३

**सही/-**
(प्रतिमा पुदलवाड - शेंगुलवार)
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
महाड उपविभाग महाड

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१७०/२०/२०२३

## निवडक

### राकेश पाटील यांना पुरस्कार

**उरण :** सामाजिक कार्यकर्ते राकेश पाटील यांना कुलाबा जीवन गौरव २०२३च्या पुरस्काराने सन्मानित करण्यात



आले. या वेळी प्रवीण ठाकूर, उमेश ठाकूर, राजा ठाकूर, रमेश नाईक, जे. टी. पाटील, भास्कर चव्हाण, सुभाष महाडीक, जगन पेढवी, प्रकाश ठाकूर, प्रभाकर काका राणे, सुनील पाटील, बी. एन. पाटील, नरहरी तोडणकर, केशव चांदोरकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. या वेळी सुयश क्लासेस आवरे, सारडे विकास मंच, कोप्रोली ग्रामस्थ मंडळ व हितचिंतकांनी राकेश पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

### देवेंद्र भुजबळांना चौथास्तंभ पुरस्कार

**नवी मुंबई :** चौथास्तंभ पुरस्कार हा विकास पत्रकारितेतील राज्यस्तरीय पुरस्कार मुंबईत मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते



एका शानदार सोहळ्यात माजी कोकण विभागीय माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांना प्रदान करण्यात आला. या वेळीही व्यासपिठावर विधिमंडळ व मंत्रालय वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, विशेष गौरवमूर्ती एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक राधेश्याम मोपलवार, अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, विठ्ठल साखर कारखान्याचे प्रवर्तक अभिजित पाटील, अभिनेते मंगेश देसाई, निमंत्रक विवेक देशपांडे व रणजीत कक्कड उपस्थित होते. या कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ज्येष्ठ संपादक, पत्रकारांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

### युईएस शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन



**उरण :** येथील उरण एज्युकेशन सोसायटी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि. ६) पालक मैदान येथे झाले. लहान ते कॉलेजचे विद्यार्थी यांनी जुन्या-नव्या गाण्यांवर सुंदर नृत्य सादर केले. या वेळी या संस्थेचे अध्यक्ष तन्सुख जैन, सचिव आनंद भिंगार्डे, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर आदी उपस्थित होते. याचसोबत डॉ. संजीवकुमार काळकेकर, डॉ. श्रुती काळकेकर, प्रिन्सिपल सिमरन दहिया, सोनाली म्हात्रे, माजी अध्यक्ष राजेंद्र भानुशाली, कुमुद भानुशाली, खजिनदार चंद्रकांत ठक्कर, मेंबर विश्वास दर्णे शिक्षक गण, विद्यार्थी, पालक वर्ग ॲड. ममता पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख ज्योती म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### हन्नत शेखचे 'आविष्कार'मध्ये यश

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी हन्नत युसुफ शेख हीने मुंबई



विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या अंतिम फेरीत पीएचडी विद्यार्थी या विभागातून द्वितीय क्रमांक मिळविला. तिने अ स्टडी ऑफ इस्लामिक मॅरेजेस : अनवेलिंग द फॅक्टस टू विप ऑफ मॅथ्स (Study of Islamic Marriages: Unveiling the Facts to Wipe Off Myths) या विषयावर संशोधन करून पोस्टर आणि पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारा सादरीकरण केले. त्यासाठी उरण महाविद्यालयाचे व्यवस्थापन समिती, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, प्रा. के. ए. शामा, प्रा. व्ही. एस. इंदुलकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण आणि इतर सर्व प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन व कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. हन्नत शेख ही उरण महाविद्यालयाची पीएचडीची विद्यार्थिनी आहे.

# नवी मुंबईत परिसर स्वच्छतेला प्राधान्य

## सर्वच विभागात उत्स्फूर्त जनसहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमध्ये लोकसहभाग हे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध विभागांमध्ये अनेक उपक्रम राबविले जात असून या माध्यमातून नवी मुंबईत स्वच्छतेची चळवळ उभी राहत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासोबतच नागरिकांच्या सहभागाने स्वच्छता मोहीमा राबविल्या जात आहेत.

या सप्ताहभरात सेक्टर ११ नेरूळ येथील वाणिज्य क्षेत्रात तुलसी महिला बचत गट यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. वाशी सेक्टर १७ येथील प्रभाग क्र. ६३ मधील महाराजा मार्केटमध्ये तेथे भाजी व फळ विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी पुढाकार घेऊन मार्केटची स्वच्छता मोहीम राबविली. नेरूळमधील रामलीला मैदानात कमांडो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवित मैदान व परिसराची स्वच्छता केली.

नवी मुंबई महापालिका आणि विथ देम फॉर देम या स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ऐरोली खाडी परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येऊन खाडी किनारा व खारफुटी सफाई करण्यात आली. वाशी रेल्वे स्टेशन लगतच्या ट्री बेल्टमध्येही विशेष स्वच्छता मोहीम राबवून दुर्लक्षित पडीक जागेत स्वच्छता करण्यात आली. अशाच प्रकारे बेलापूर विभागात सागर किनारी नवी मुंबई महापालिकेसह एन्व्हायरमेंट लाईफ, आवाज फाऊंडेशन व डिवाईन फाऊंडेशन आणि एसआयईएस कॉलेज, नेरूळ यांनी एकत्रित सहयोगाने खाडी किनारा व परिसराची स्वच्छता केली.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये ड्राय वेस्ट बँक ही अभिनव संकल्पना राबविण्यास सुरुवात झाली असून त्याची व्याप्ती वाढविण्याच्या



### सार्वजनिक ठिकाणी प्रबोधन

**रबाळे रेल्वे स्टेशन परिसरात रिक्षा स्टँड आणि पार्किंग परिसर याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याप्रमाणेच सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये या विषयी जनप्रबोधन करण्यात आले. सेक्टर ५ सानपाडा येथील नागरिकांच्या कार्यशाळेमध्ये स्वच्छतेच्या बाबींविषयी जनजागृती करण्यात आली. सेक्टर ५ ऐरोली येथील भास्कर घाडी मैदानातही परिसर स्वच्छतेसह जनजागृतीपर कार्यशाळा घेण्यात आली. असे नानाविध उपक्रम राबवित नवी मुंबई महापालिकेच्या सर्वच विभागांमध्ये स्वच्छतेचा जागर केला जात असून निश्चय केला-नंबर पहिला हे ध्येय वाक्य साध्य करण्यासाठी नागरिकांच्या सक्रीय सहभागातून विशेष प्रयत्न केले जात आहेत.**

दृष्टीने बेलापूर विभागातील नवी मुंबई महापालिकेच्या तसेच खाजगी शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांची विशेष बैठक घेऊन त्यांना या संकल्पनेचे महत्त्व पटवून देण्यात आले. अशाच प्रकारची विशेष कार्यशाळा सेक्टर ८ बी सीबीडी बेलापूर येथील पीपल्स एज्युकेशन्स सोसायटीच्या शाळेत घेण्यात आली. त्याचप्रमाणे शाळा क्र. २९ व ११० वाशी सेक्टर १६ येथेही विद्यार्थ्यांना स्वच्छता उपक्रमात सहभाग घेण्याविषयी प्रोत्साहित करण्यात आले.

कचरा निर्मितीच्या ठिकाणीच ओला, सुका व घरगुती घातक असे तीन प्रकारे वर्गीकरण करण्यात यावे, घरातील ओल्या कचऱ्याचे शक्यतो घरातच कंपोस्ट बास्केट वापरून खत निर्मिती करावी. सोसायटी व वसाहतीच्या आवारात कंपोस्ट पिट्स उभारावेत, प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णत: बंद करावा, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याला प्रतिबंध असावा अशा विविध विषयांवर महानगरपालिका क्षेत्रात ठिकाठिकाणी जनजागृतीपर कार्यशाळा घेण्यात आल्या. तसेच उपक्रम राबिवण्यात आले. यामध्ये ईश्वरनगर दिघा येथील स्वामी विवेकानंद शाळेच्या परिसरात नागरिकांच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सिध्दीविनायक मंदिराजवळ प्र.क्र. २ दिघा येथे जनजागृती करण्यात आली. गणपतीपाडा दिघा येथेही जनजागृती करण्यात आली. सेक्टर १८ रॉक गार्डन नेरुळ येथे ज्येष्ठ नागरिक समुहाच्या वतीने स्वच्छतेची शपथ घेऊन जनजागृती उपक्रम राबविला गेला.

### कागदी पिशव्यांचे वितरण

***अनेक वर्दळीच्या ठिकाणीही स्वच्छतेविषयीच्या जनजागृतीपर उपक्रमांवर भर देण्यात आला असून एसआयईएस महाविद्यालयाचे एनएनएस युनीट आणि जयश्री फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सेक्टर ४० नेरुळ येथील सीवूड ग्रँड सेंट्रल मॉल याठिकाणी मॉलमध्ये येणाऱ्या ग्राहकांमध्ये तसेच तेथील व्यावसायिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे टाळण्यासाठी आवाहनही करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या उपस्थितीत जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी बनविलेल्या कागदी पिशव्यांचे वितरण करण्यात आले.***

## सीकेटी विद्यालयात मंगळवारी स्नेहसंमेलन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागचे २३वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ 'लिजेंड्स फॉरएव्हर' या शिर्षकाखाली मंगळवारी (दि. १०) सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संस्थेच्या मुंबई विभागीय सहसचिव डॉ. ज्योती परिहार (सोलंकी) आहेत. तसेच प्रमुख मान्यवर संस्थेचे व्हाईस चेअरमन तथा भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात आहेत. कार्यक्रमाचे नियोजन सायन्स विभागाच्या पर्यवेक्षक स्वाती पाटील, आर्ट्स ॲण्ड कॉमर्स विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनावणे, सीकेटी विद्यालयाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रशांत मोरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी करणार आहेत.



**नवी मुंबई : जुईनगर येथे जय भवानी मित्र मंडळद्वारे जुईनगर ते एकविरा मंदिर येथे नवी मुंबई मानाची पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मानाच्या पालखी आमदार गणेश नाईक यांनी जुईनगर येथे दर्शन घेतले. या वेळी मोठ्या संख्यने युवा भाविक सहभागी झाले होते.**

## 'गृहनिर्माण संस्थांनी सदस्यत्व घ्यावे'

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था अद्यापी नवी मुंबई को-ऑप हौसिंग फेडरेशन लि. या गृहनिर्माण संस्थेचे सदस्य झालेले नाहीत त्यांनी त्वरीत सदस्य व्हावे, असे आवाहन फेडरेशनचे सचिव भास्कर म्हात्रे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. हे सदसत्व मंजुर आदर्श उपविधी कं ६ अन्वये प्रत्येक सोसायटीला बंधनकारक आहे. राज्यातील जिल्हा फेडरेशनच्या धरतीवर नवी मुंबईसाठी सदर फेडरेशनची स्थापना १९९९ साली करण्यात आली आहे.

गृहनिर्माण संस्थेचा कारभार सुरळीत व महाराष्ट्र को ऑप सोसायटी ॲक्ट १९६० व नियम १९६१ नुसार व्हावा म्हणून फेडरेशनचे सदस्य होणे हे अत्यंत आवश्यक आहे. व्यवस्थापन समितीचे सदस्य, त्याचबरोबर गृहनिर्माण संस्थेच्या सर्व सदस्यांची कर्तव्य व अधिकार याबाबत फेडरेशनकडुन वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. गृहनिर्माण संस्थेसाठी बदलते कायदे, दुरूस्त्या शासकीय परिपत्रके याबाबतची माहिती फेडरेशनकडुन वेळोवेळी सदस्य संस्थांना दिली जाते. सहकारी संस्थेचे व्यवस्थापन यावर संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य याच्यासाठी फेडरेशनतर्फे ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रशिक्षण शिबिरे नियमितपणे आयोजीत केली जातात.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दैनंदिन कारभारासंदर्भात लागणारे सर्व प्रकारचे फॉर्म, आदर्श उपविधी, शेअर्स सर्टिफिकेट सर्व प्रकारचे रजिस्टर, इत्यादी शासकीय नमुन्यातील साहीत्य फेडरेशनच्या कार्यालयात उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी फेडरेशनचे कार्यालय ३०३, बिग स्प्लॅश इमारत, ३ रा मजला, सेक्टर- १७, वाशी, नवी मुंबई, इथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रसायनीतील विद्यार्थ्यांनी बनविल्या 'टिकाऊ' वस्तू

**रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी अपसायकलिंग वर्कशॉपमध्ये (टाकावूपासून टिकाऊ वस्तू कार्यशाळा) मिळालेल्या मार्गदर्शनानुसार टाकावू वस्तूंपासून मूल्यवर्धित टिकाऊ वस्तू तयार केल्या होत्या. त्या वस्तूंचे अंतिम प्रदर्शन पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथे शनिवारी (दि. ७) R I DISTRICT 3131ने आयोजित केले होते. यामध्ये रसायनीतील विद्यार्थ्यांना सुयश प्राप्त झाले आहे.

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा, रोटरी क्लब ऑफ बारामती, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि रोटरी क्लब ऑफ पुणे युवा या चार क्लबनी निवडलेल्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाने निवडलेल्या डॉ. पारनेरकर महाराज कनिष्ठ महाविद्यालयातील खालील विद्यार्थी यशस्वी ठरले.

वैष्णवी महेश नावडे (११वी विज्ञान शाखा-द्वितीय क्रमांक) १००० रुपये रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र, प्रफुल विष्णु मेढेकर (१२ वी विज्ञान शाखा-परिक्षकांचे विशेष उत्तेजनार्थ) १००० रुपये रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र, याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी सानिया देविदास पाटील हिला प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत तिची कविता सादर करण्याची संधी मिळाली.

या सर्व विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयातील व्याख्याते डॉ. अनिल रामराव पाटील यांनी मार्गदर्शन लाभले. इतर सात विद्यार्थ्यांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र व मराठी विज्ञान परिषद प्रकाशित पुस्तिका देण्यात आली. रो. अध्यक्ष अमित शहा, रो. सचिन थोरात आणि रो. बाळकृष्ण होनावळे हे विद्यार्थ्यांबरोबर गेले होते. त्यांचाही उद्घाटनाच्या, प्रोजेक्ट सादरीकरणाच्या आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी सक्रीय सहभाग होता. प्रकल्प ६ ही शाळा आणि संबंधित शिक्षक आणि विद्यार्थी व पालक यांच्या सहकार्यामुळे यशस्वी होऊ शकला.



## नवी मुंबईत रिक्षाचालकांचा सत्कार



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे वाहतूक विभाग आणि शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांच्या विद्यमाने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन सप्ताह निमित्ताने वर्षभर अपघात विरहित रिक्षा चालवणाऱ्या रिक्षाचालकांचा सत्कार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गीते यांच्या हस्ते शिव वाहतूक सेना अध्यक्ष दिलीप आमले (शिंदे गट) यांच्या प्रमुख उपस्थितीत तुर्भे येथे करण्यात आला.

या वेळी रिक्षाचालकांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते म्हणाले की, वाहन चालक प्रवाशांचा सारथी असतो. स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारीही त्यांच्यावरच असते. त्यामुळे रिक्षा चालकांनी सुरक्षित वाहन चालवावे असे सांगत रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळले तर अपघात नियंत्रित येऊ शकतात म्हणून वाहतुकीचे नियम पाळणे प्रत्येक वाहन चालकांचे कर्तव्य असल्याचे नितीन गीते यांनी सांगितले. या वेळी उपस्थित रिक्षा चालकानी रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा घेतली तसेच अपघात ग्रस्तांच्या मदतीला सेवाभावी वृत्तीने धावून जात मदतीचा हात पुढे करणाऱ्या रिक्षा चालकांचा सन्मान नितीन गीते यांनी केला.

शिव वाहतूक सेनेचे जितेंद्र उपाध्ये, जयराम पाटील, अर्जुन डुकरे, उत्तम आंबावडे, संतोष जाधव आदींसह पोलीस कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

## किडनी ट्रान्सप्लांट ऑपरेशनसाठी मदत

**उरण : बातमीदार**

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या कपिल पाटील फॉउंडेशन व उरण तालुक्यातील खोपटे गावातील सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल तालुक्यातील केळवणे गावातील अविनाश मोकल यांना किडनी ट्रान्सप्लांट ऑपरेशनसाठी २ लाखाची मदत मुख्यमंत्री सहायता निधी मधून झाली आहे व ही बॉम्बे हॉस्पिटल च्या अकाउंट वर जमा सुध्दा झाली आहे.

> केंद्रीय मंत्री कपिल पाटील व गोरख ठाकूर यांचे प्रयत्न

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी केलेल्या विनंती पत्राच्या आधारे राज्यपाल भगतसिंग कोशारी यांच्या शिफारशीने हा निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच संम्बधित पेशंटचे ऑपरेशन करण्यात येणार आहे तसेच ह्यापुढे उरण पनवेल तालुक्यात कुणालाही अशी वैद्यकीय मदतीची गरज असेल तर गोरख ठाकूर (९७०२५३५१६९) यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गोरगरीब जनतेला, रुग्णांना आजाराच्या उपचारांसाठी सर्वतोपरी मदत केली जाईल. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मिळवून देण्यास मदत केले जाईल, असे सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर यांनी सांगितले. गोरख ठाकूर हे गोरगरिबांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्नशील आहेत. त्यांनी आजपर्यंत अनेक लोकांना सामाजिक बांधिलकीतून कोणाकडूनही एक रुपयाही न घेता निरपेक्ष भावनेने वैद्यकीय निधी, मदत मिळवून दिली आहे.

## संत्री, मोसंबी महागली

### आवक कमी झाल्याने किमतीत वाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती घाऊक फळबाजारात अंजीर, स्ट्रॉबेरी आवक वाढली आहे, परंतु गावठी संत्री-मोसंबी आवक कमी झाली आहे. त्यामुळे दरात वाढ झाली आहे.



एपीएमसीमध्ये सर्व हंगामात मद्रासची मोसंबी जास्त प्रमाणात उपलब्ध असते. नोव्हेंबर-डिसेंबरपासून बाजारात गावठी संत्री मोसंबी दाखल होते. मद्रासची मोसंबी ही आकाराने मोठी व चवीला आंबट असतात अशी मोसंबी जास्तीत जास्त रसाकरीता वापरली जातात, मात्र नागपूरचे गोड मोसंब नागरिक आवडीने खात असतात.

परदेशी संत्री हे आकाराने मोठी असून चवीला गोड नसते, परंतु गावठी संत्री आकाराने लहान तसेच रसरशीत असते. ग्राहकांच्या मागणीनुसार बाजारात गोड मोसंबीची आवक कमी प्रमाणातच होत असते. बाजारात नागूपरची मोसंबी दाखल होताच त्या मालाचा उठाव लगेच होतो. संत्र-मोसंबीच्या एकूण ४०-५० गाड्या दाखल होत असतात, परंतु आता बाजारात अवघ्या पाच गाड्या दाखल झाल्या असून दर वाढले आहेत. आधी मोसंबीच्या दरात २० ते ४० रुपयांनी वाढ झाली आहे. प्रतिकिलो ६०-८० रुपये तर आता ८०-१२० रुपयांनी विक्री होत आहे. संत्र्याच्या दरात १००-२०० रुपयांची वाढ झाली असून ८ डझनला आधी ८००-१२०० रुपये तर आता ९००-१४०० रुपयांना उपलब्ध आहे. तर स्ट्रॉबेरी आवक वाढली असून नाशिक आणि महाबळेश्वर येथील चार हजार क्रेट दाखल होत आहेत. त्यामुळे स्ट्रॉबेरीचे दर कमी झाले आहेत.

# तहसीलदार यांच्याहस्ते खालापूर तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान

खालापूर : तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघ व खालापूर तालुका वकील बार असोशिऐशन यांच्या विद्यमाने बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान सोहळा खालापूर तालुका तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पत्रकारांना मार्गदर्शन करताना तांबोळी यांनी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याची माहिती दिली.

# आमदार महेंद्र दळवी यांचा ठाकरे शिवसेनेवर निशाणा

## पालीत बाळासाहेबांच्या शिवसेनेच्यावतीने सरपंच, उपसरपंच, सदस्यांचा सत्कार




**पाली : प्रतिनिधी**

बाळासाहेबांच्या शिवसेनेच्यावतीने पाली बल्लाळेश्वर नगरीत सुधागड तालुक्यातील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच, सदस्यांचा पाली भक्तनिवास १ येथे आमदार महेंद्र दळवी, जिल्हाप्रमुख राजा केणी, जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई , रविंद्र देशमुख व अन्य मान्यवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वाद्यवृंद व घोषणांच्या गजरात पाली शहरातून रॅली काढण्यात आली.

राज्याच्या राजकारणावर देखील दळवींनी भाष्य केले. महेंद्र दळवी यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर जहरी टिका केली. संजय राऊत यांचा तमाशातील कलाकार असा उल्लेख करीत ज्याला ग्राम पंचायत निवडुन आणण्याची लायकी नाही अशा माणसाच्या वक्तव्याची दखल काय घ्यायची, अशी खिल्ली दळवी यांनी उडवत हे सरकार पाच वर्ष टिकेल असा विश्वास दळवी यांनी व्यक्त केला. अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली बल्लाळेश्वर नगरीत सुधागड तालुका नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अलिबाग मुरुड मतदारसंघाचे आ.महेंद्र दळवी, जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश भाऊ देसाई, जिल्हाप्रमुख राजा केणी, माजी जि प सदस्य, तथा सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख,माजी जि. प सभापती संजय जांभळे, उपजिल्हाप्रमुख अनुपम कुलकर्णी, युवक जिल्हाध्यक्ष संजय म्हात्रे, ॲड. मनोज शिंदे उपस्थित होते.

# माणगावच्या साबळे विद्यालयात विद्यार्थी- पालक कार्यशाळा

**माणगाव :** अशोकदादा साबळे कॉलेजचे प्राचार्य डी. एम.जाधव यांनी दिशा अकॅडमी वाई या संस्थेशी सम्पर्क साधून माणगांव तालुक्यातील अनेक विद्यार्थी व पालकांची १२ वी नंतरच्या क्रॅश कोर्सची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी मंगळवार १० जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता अशोकदादा साबळे विद्यालय माणगांव येथे खास कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेस विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहावे असे आयोजकांच्यावतीने सांगण्यात आले आहे.पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास आमच्या संस्थेत क्रॅश कोर्स सुरू केले जाईल असे संस्था अध्यक्ष राजीवजी साबळे यांनी सांगितले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे-उलवे, सोनखार, तरघर, ता.पनवेल, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक **श्री. अंबु विठ्ठल म्हात्रे** यांच्याकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्विकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**१. संपादित जमीन व इरादित भूखंडाचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गावाचे नाव/संचिका क्र. | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे नं./हिस्सा नं. | संपादित क्षेत्र (हे.आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| ११६६/उलवे | ६ अ | ४/३<br>७/८<br>११३/६ | ०-१०-०<br>०-०९-०<br>०-०१-० | उलवे | १९ | ४२१ | १५० चौ.मी. |
| ११६६/तरघर | ११२ ब | १७/१२ | ०-०२-४ | उलवे | २ | १०२ | ४० चौ.मी. |
| ११६६/तरघर | १६२ ब | १०/५ | ०-०९-६ | उलवे | ३ | ५६ | १०० चौ.मी. |

शासनाने घेतलेल्या निर्णयानूसार साडेबारा टक्के योजनेंर्गत भूधारकांना उलवे नोड येथे **भूखंड क्र. ४२१, सेक्टर १९, क्षेत्र १५० चौ.मी., भूखंड क्र. १०२, सेक्टर २, क्षेत्र ४० चौ.मी. व भूखंड क्र. ५६, सेक्टर ३, क्षेत्र १०० चौ.मी.** या भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारकांपैकी **अ) कै. अंबु विठ्ठल म्हात्रे यांचे कायदेशीर वारस** १) श्री. गुरुनाथ अंबू म्हात्रे २) श्रीमती द्रोपदी मोतीराम मढवी ३) श्रीमती रंजना जनार्दन पाटील व ४) श्रीमती अंजु उर्फ अंजना राम पाटील **ब) कै. महादीबाई बाळाराम घरत यांचे कायदेशीर वारस** १) श्री. महेंद्र उर्फ महेंद्रकुमार बाळाराम घरत २) श्रीमती जनाबाई बाळाराम घरत उर्फ श्रीमती जनाबाई महादेव म्हात्रे ३) श्रीमती मथुरा अंकुश पाटील व ४) श्रीमती सुवर्णा सुरेश पाटील, **क) कै. यशवंत बाळाराम घरत यांचे कायदेशीर वारस** १) श्रीमती शोभा यशवंत घरत २) श्रीमती प्रतिभा संतोष वर्तक ३) श्री. विजय यशवंत घरत व ४) श्री. राजेश यशवंत घरत **ड) कै. नागुबाई हासू घरत यांचे कायदेशीर वारस** १) श्रीमती जयश्री नरेश म्हात्रे यांनी सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयाकडे हक्कसोड पत्र क्र. पवल५-१६६७२-२०२२ अन्वये दिनांक १४.१०.२०२२ रोजी हक्कसोडपत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **श्री. कृष्णा विठ्ठल म्हात्रे** यांच्या लाभात हस्तांतरित केले अहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरुवार, मे २९, २०१४/ज्येष्ट ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट-१९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१० अ**' मधील मुद्दा क्र. **ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये **भूखंड क्र. ४२१, सेक्टर १९, क्षेत्र १५० चौ.मी., भूखंड क्र. १०२, सेक्टर २, क्षेत्र ४० चौ.मी. व भूखंड क्र. ५६, सेक्टर ३, क्षेत्र १०० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे उलवे येथील निवाडा क्र. ६अ, सं. नं./हि. नं. ४/३, ७/८ व ११३/६, निवाडा क्र. ११२, सं. नं./हि. नं. १७/१२ व निवाडा क्र. १६२ ब, सं. नं./हि. नं. १०/५ एकूण संपादित क्षेत्र ०-३२-० हे. आर या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|
| **अ) कै. अंबु विठ्ठल म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. गुरुनाथ अंबु म्हात्रे<br>२) श्रीमती द्रोपदी मोतीराम मढवी<br>३) श्रीमती रंजना जनार्दन पाटील<br>४) श्रीमती अंजु उर्फ अंजनी राम पाटील<br>**ब) कै. महादीबाई उर्फ महादुबाई बाळाराम घरत (मयत) यांचे वारस**<br>५) श्री. महेंद्र उर्फ महेंद्रकुमार बाळाराम घरत<br>६) श्रीमती जनाबाई महादेव म्हात्रे<br>७) श्रीमती मथुरा अंकुश पाटील<br>८) श्रीमती सुवर्णा सुरेश पाटील<br>**९) कै. यशवंत बाळाराम घरत (मयत) यांचे वारस**<br>९/१) श्रीमती शोभा यशवंत घरत<br>९/२) सौ. प्रतिभा संतोष वर्तक<br>९/३) श्री. विजय यशवंत घरत<br>९/४) श्री. राजेश यशवंत घरत<br>**क) कै. नागुबाई हाशा घरत (मयत) यांचे वारस**<br>१०) श्रीमती जयश्री नरेश म्हात्रे | **श्री. कृष्णा विठ्ठल म्हात्रे** |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोडनुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|
| **श्री. कृष्णा विठ्ठल म्हात्रे** |

वरील इरादित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजनेसंदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/३९४/२०२२-२३**


## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**डिसेंबर २०२२**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकाश नामदेव तुपे अश्विनी प्रकाश तुपे | चंद्रकांत सखाराम मोरे | पवल ५-५१०० २०२१ | २७/०३/२०२१ | सदनिका क्र. १०१, ए विंग, पहिला मजला, समृध्द भुमी को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| २ | महेश भास्कर झेमसे हर्षदा शांताराम चवरकर | नितीन बजरंग दिवटे | पवल २- १३५५६ २०२२ | २८/०९/२०२२ | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, सि विंग, निंबेश्वर पार्वती, को. ऑप. हौ. सो. ली. मौजे पालीदेवद. |
| ३ | प्रशांत बळीराम जाधव पूजा प्रशांत जाधव | सैफुन अहमद मुल्ला यांचा तर्फे कु. मु. शबना फझल काझी इखलास अहमद मुल्ला यांचा तर्फे कु. मु. शबना फझल काझी अहमद अब्दुल रहिमान यांच्या तर्फे शबाना काझी | पवल २- १६५५३ २०२२ | ३०/११/२०२२ | सदनिका क्र. बी १०१, पहिला मजला, साक्षी पार्क २ बिल्डींग नं. ५, को. ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ४ | प्रतिक भालचंद्र वरेकर लिना भालचंद्र वरेकर | शंकर गणपत जंगम | पवल ३- १५५२३ २०२१ | ०४/१०/२०२१ | सदनिका नं. डी-१०१, पहिला मजला, डी विंग, बिल्डींग नं. ३. कार्तिक्या पार्क को ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ५ | जोसेफ जॉनी आरंगसेरी शेय जोसेफ आरंगसेरी | स्नेहल विजय सावंत | पवल ५- १७३९८ २०२२ | ३१/१०/२०२२ | रो हाऊस नं. १०, प्रोजेक्ट चे नाव, प्रेम नगरी व रेजिस्टर्ड सोसायटी चे नाव श्री ओंकार रो हाऊस को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद |
| ६ | आनंदी अशोक पाटील | विजय लक्ष्मण कांबळे | पवल -१८०७५ २०२२ | १०/११/२०२२ | सदनिका क्र. १०६, पहिला मजला, बिल्डींग क्र. सी. ओमशक्ती कॉम्प्लेक्स सह. गृह. नि. संस्था लि. मौजे पालीदेवद |
| ७ | रामराव सवाईसिंग राठोड चंद्रकला रामराव राठोड | रिचर्ड अँन्थोनी मथाईम | पवल २-७११५ २०२२ | १३/०५/२०२२ | सदनिका क्र. सी. १०३, पहिला मजला, स्वामी सदन को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद |
| ८ | अमित तुकाराम पोसम अमिता अमित पोसम | राजेश रामचंद्र भुर्के रिया राजेश भुर्के | पवल ४-६४२१ २०२२ | १९/०५/२०२२ | सदनिका क्र. डी. ३०२, तिसरा मजला, बिल्डींग नं. २, जम्नोत्री सागर को. ऑप. हौ. लि. गाव शिलोत्तर रायचूर. |
| ९ | वैदही गिरीश कोदेरे गिरीश गजानन कोदेरे | हेमंत बाळाराम म्हसकर | पवल २-१४२०६ २०२२ | ११/१०/२०२२ | सदनिका क्र. २०६, दुसरा मजला, ए विंग, निंबेश्वर पार्क को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| १० | राजवर्धन तुळशिराम पाटील | किशटाना मगाता डेसिती सुकुमारी के डेसिती | पवल १-२९ २०१३ | ०२/०१/२०१३ | सदनिका क्र. ३०९ तिसरा मजला, बिल्डींग नं. ३ शांतीनिकेतन को. ऑप. हौ. सो. लि. युगांतक कम्प्लेक्स मौजे पालीदेवद |
| ११ | विजय फक्कडराव तळोले | विक्रम देवराम भोसले | पवल २- १७५७५ २०२२ | १६/१२/२०२२ | सदनिका नं. सी २०३, दुसरा मजला, गोकुलधाम कॉम्प्लेक्स को. ऑप. हौ. सो. लि. बिल्डींग नं. १, मौजे पालीदेवद |
| १२ | अश्विनी अनिल कांबळे | सुनिल सुभाष चव्हाण | पवल ५-५७२९ २०२२ | ०१/०४/२०२२ | सदनिका नं.४ तळ मजला, बिल्डींग नं. बी १, अविष्कार को. ऑप. हौ. सो.लि., युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद. |
| १३ | शोभा शंकर कारंडे केदार शंकर कारंडे | अंकुश प्रकाश चौधरी सोनल अंकुश चौधरी | पवल ४-२४७२ २०१७ | १८/०३/२०१७ | सदनिका क्र. १०४, पहिला मजला इ-विंग, बिल्डींग नं. ५, साई इन्कलेव्ह, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १४ | विशाल दत्तात्रय शेवाळे स्नेहलकुमार दत्तात्रय शेवाळे | गीताराम बापू मोरे | पवल ४-३११५ २०१९ | २५/०३/२०१९ | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, बिल्डींग नं. ०४, साक्षी पार्क- २, को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद |
| १५ | योजना आशिष भगत | मोतिलाल ओसवाल होम फायनान्स तर्फे पांडुरंग दगडू जाधव | पवल २- १६३९४ २०२२ | २५/११/२०२२ | सदनिका क्र. २०६, दुसरा मजला,राजहन्स रेसिडेंन्सी हाऊस नं. ६२, मौजे पालीदेवद |
| १६ | मारूती बबन चिकणे | नंदा गोविंद गोडे | पवल ३- ११२८३ २००७ | २२/११/२००७ | सदनिका क्र. ११, पहिला मजला, बी विंग, बि. नं. एड ६/ ३ आकाश को. ऑप. हौ. सो.लि. मौजे पालीदेवद. |
| १७ | वैभव रमेश सोनावणे | एल्सी जॉन्सन D/o वर्गीस थॉमस | पवल ५-६९६६ २०१६ | ३१/०८/२०१६ | सदनिका क्र.०२, तळ मजला, बिल्डींग नं. जी- ५ नर्मदा सुकापुर को. ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १७ | राजश्री जगन्नाथ कोळी जगन्नाथ लक्ष्मण कोळी | अश्विनी अविनाश घाग | पवल २-८२९० २०२१ | २१/०६/२०२१ | सदनिका क्र. ए ३०१, तिसरा मजला, ए विंग, बिल्डींग नं. ३ कार्तिकेय पार्क को. ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | प्रदीप चंद्रकांत शिंदे | चंद्रकांत धोंडीबा शिंदे | पवल ३-८१४९ २०२१ | ०७/०५/२०२१ | सदनिका क्र. १०३, ए विंग, बिल्डींग नं. ८, पहिला मजला, त्रिमुर्ती को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद. |
| २० | हर्षल दिलीप म्हात्रे दिलीप बारकाजी म्हात्रे | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अभिषेक भारती, प्रविण शामसुदर साहु, रमेश देवजी गजोरा, वासुदेव गंगाराम बडे, संदिप दिलीप शेवाळे आणि साहेकुमार सयाना करिपे या सर्वांच्या वतीने विशाल अनिल खरारे. | पवल २-४६६८ २०२२ | २७/०३/२०२२ | सदनिका क्र. २०५, दुसरा मजला, अे विंग, श्रीराम दर्शन मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २१ | कृष्णा रामचंद्र लाड श्रद्धा कृष्णा लाड | अमृतलाल बिंद | पवल २-१५७२० २०२२ | १४/११/२०२२ | सदनिका क्र. सी. २०२, दुसरा मजला, सी विंग, समृद्धभूमी को. हौ. सो. मौजे पालीदेवद |
| २२ | विशाल सुरेशचंद्र श्रीवास अल्पना व्ही. श्रीवास | तरूण कुमार अशोक कुमार भाटला सॅन ऑफ अशोक कुमार क्रिशनलाल भाटला. शशिबला अशोक कुमार भाटला वाइफ ऑफ आशोक कुमार क्रिशनलाल भाटला | पवल ५-२०६६४ २०२२ | २३/१२/२०२२ | रो हाऊस नं. ०२ विघ्नहर्ता इन्कलेव्ह, मौजे शिलोत्तर रायचूर, |
| २३ | राजदीप उत्तमराव जाधव अनुषा राजदीप जाधव | सुदर्शन राजाराम गांजेकर | पवल ३-७९२४ २०१९ | ०७/०५/२०१९ | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, ए विंग, बिल्डींग नं. ५, साई ईन्क्लेव को. ऑप. हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २४ | यशोदा रमेश गायकवाड | चंद्रकांत शंकर वंजारी | पवल २-१६४२७ २०२२ | २५/११/२०२२ | सदनिका नं. २, तळ मजला, बिल्डींग नं. ए ६-२ युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, प्रेरणा को. ऑप. हौ. सो. लि. मौजे. पालीदेवद. |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**



## टी-२० मालिकेत भारताचा श्रीलंकेवर विजय

# सूर्यकुमारचे नाबाद शतक

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने श्रीलंकेविरूद्ध राजकोटच्या स्टेडियमवर शनिवारी (दि. ७) खेळल्या गेलेल्या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा टी-२० सामना ९१ धावांनी जिंकला. सूर्यकुमार यादवच्या नाबाद शतकी खेळीमुळे भारताने पाच गडी गमावून २२८ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १३७ धावांत सर्वबाद झाला.

सूर्यकुमार यादवने शानदार फलंदाजी करीत ५१ चेंडूत नाबाद ११२ धावा केल्या. यादरम्यान त्याने सात चौकार आणि नऊ षटकार मारले. शुभमन गिलने ४६ तर अक्षर पटेलने नऊ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या.

सूर्यकुमार यादवने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा विश्वविक्रम केला आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणत्याही फलंदाजाला ही कामगिरी करता आलेली नाही. सूर्यकुमार यादवने राजकोटमध्ये श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ४५ चेंडूत शतक पूर्ण केले. असे केल्याने तो भारतासाठी सर्वात जलद शतक झळकावणारा दुसरा फलंदाज ठरला. त्याचवेळी चौथ्या क्रमांकावर खेळताना त्याने शतक झळकावून इतिहास रचला, कारण त्याच्याआधी कोणत्याही फलंदाजाला सलामीशिवाय तीन शतके झळकावता आलेली नाहीत.

भारतासाठी सर्वाधिक शतके करणारा सूर्या हा दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याने केएल राहुलला मागे टाकले आहे. आता त्याच्या पुढे फक्त रोहित शर्मा आहे, ज्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये चार शतके झळकावली आहेत. सूर्यकुमार आता तीन शतकांसह दुसऱ्या तर केएल राहुल दोन शतकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. त्यांच्याशिवाय सुरेश रैना, दीपक हुडा आणि विराट कोहली यांनी प्रत्येकी एक शतक झळकावले.

कर्णधार हार्दिक पांड्याने सामन्यानंतर सांगितले की, कर्णधार म्हणून माझ्या आयुष्याचा उद्देश मी माझ्या खेळाडूंना पाठिंबा देईन. तो भारतातील सर्वोत्तम टी-२० क्रिकेटपटू आहे आणि म्हणूनच ते येथे आहे. या फॉरमॅटमध्ये शंका घेण्यास जागा नाही आणि आम्ही योग्य मार्गाने खेळाडूंना पाठीशी घालत आहोत. आम्ही मालिकेत ज्या पद्धतीने खेळलो ते आनंददायी आहे.

# सावरकर स्मारकाच्या खेळाडूंचे तायक्वांडो व तलवारबाजीत सुयश



**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकातील तायक्वांडो या साहसी खेळाच्या उपक्रमातील विद्यार्थी अभिजीत पाटील याने पंजाबमधील अमृतसर येथे सुरू असलेल्या तायक्वांडोच्या राष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले, तर औरंगाबाद येथे सुरू झालेल्या महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक तलवारबाजी स्पर्धेत मुंबई संघाकडून खेळताना सावरकर फेन्सिंग क्लबची वैभवी इंगळे हिने रौप्यपदक आणि आदित्य राठोड याने कांस्यपदक मिळविले.

अस्थिभंगाची दुखापत झालेली असतानाही अभिजितने तायक्वांडोमध्ये आपल्या खेळाचे साहसाने आणि धैर्याने प्रदर्शन केले होते. अलिकडेच अभिजितने महाराष्ट्र राज्यस्तरीय आणि मुंबई विद्यापीठ यामधील तायक्वांडोच्या स्पर्धेतही सुवर्णपदक जिंकले होते. सावरकर स्मारकाच्या वतीने तायक्वांडोचे प्रशिक्षण देण्यात येते.

राजेश खिलारी हे त्याचे प्रशिक्षक आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष आणि महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष रणजित सावरकर यांनी अभिजितच्या या यशाबद्दल कौतुक केले आहे. दरम्यान, पुणे बालेवाडी येथे महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिकच्या मंचावर अभिजित पाटील याचा दिग्गजांनी यानिमित्ताने सन्मानही केला.

तलवारबाजीच्या क्षेत्रात राज्य शासन व महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे सुरू झालेल्या महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक तलवारबाजी स्पर्धेत मुंबई संघाकडून खेळताना सावरकर फेन्सिंग क्लबची वैभवी इंगळे हिने वैयक्तिक फॉइल प्रकारात रौप्यपदक व आदित्य राठोड याने वैयक्तिक ईपी प्रकारात कांस्यपदक प्राप्त केले. या दोघांचे प्रशिक्षक राहुल वाघमारे होते.

# स्व. प्रभाकर राणे चषकाचा मानकरी ठरला मरीदेवी संघ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आवास येथे कृषक महोत्सवानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेत मरीदेवी धेरंड संघ स्व. प्रभाकर राणे चषकाचा मानकरी ठरला.



कृषक महोत्सवानिमित्त स्व. प्रभाकर राणे यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीस कबड्डी भरविण्यात आल्या होत्या. कबड्डी स्पर्धेत नामवंत १६ संघांचा समावेश करण्यात आला होता. स्पर्धेचे उद्‌घाटन विधानसभेचे अध्यक्ष आमदार राहुल नार्वेकर यांनी केले. त्यांनी सर्व खेळाडूंना व आयोजकांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी अ‍ॅड. आस्वाद पाटील यांनीही सर्वांना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत उपविजेता शिवाई बांधण संघ, तृतीय गणेश क्लब उरण व चतुर्थ क्रमांकाचे मानकरी रोहा संघ हे संघ विजेते ठरले. उत्कृष्ट पक्कड बाजी पाटील, उत्कृष्ट चढाई सौरभ राऊत, सर्वोत्कृष्ट खेळाडू ऋत्विक पाटील अशा उत्कृष्ट खेळी करणाऱ्या संघाला व खेळाडूंना पारितोषिके देऊन ज्येष्ठ खेळाडू रणजीत राणे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धा पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने क्रीडारसिक उपस्थित होते. सरपंच अभिजीत राणे यांनी स्पर्धेचे राष्ट्रीय खेळाडू व पंच कमिटीचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## दुबई स्पर्धेनंतर सानिया मिर्झाची निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची आघाडीची टेनिसपटू सानिया मिर्झाने पुढील महिन्यात होणाऱ्या दुबई टेनिस स्पर्धेनंतर आपल्या टेनिस कारकीर्दीचा निरोप घेण्याचा निर्णय घेतला आहे. दुबई टेनिस स्पर्धा ही आपल्या कारकीर्दीमधील अखेरची स्पर्धा असेल, असे सानियाने 'डब्ल्यूटीए'ला कळवले आहे.

गेल्या हंगामाच्या अखेरीस सानियाने निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला होता, पण कोपराच्या दुखापतीमुळे तिला अमेरिकन स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. कोपराच्या दुखापतीमुळे गेल्या वर्षी ऑगस्टपासून खेळता आले नाही, असे सानियाने मुलाखतीत म्हटले आहे.

# फ्रान्सच्या बेंजामिन बोन्झीवर तीन सेटमध्ये विजय

**पुणे : प्रतिनिधी**

नेदरलँड्सच्या टॅलन ग्रीक्सपूरने अत्यंत चुरशीच्या लढतीत फ्रान्सच्या बेंजामिन बोन्झीचे आव्हान तीन सेटमध्ये परतवून लावताना टाटा खुल्या महाराष्ट्र टेनिस स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. ग्रीक्सपूरचे कारकीर्दीमधील एटीपी २५०च्या मालिकेतील हे पहिलेच विजेतेपद ठरले. दुहेरीत बेल्जियमची सॅण्डर गिले-जोरान व्लिजेन जोडी विजेती ठरली.



टाटा खुली महाराष्ट्र टेनिस स्पर्धा

पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात शनिवारी झालेल्या एकेरीच्या अंतिम लढतीत ग्रीक्सपूरने वेगवान सव्हिसच्या जोरावर फ्रान्सच्या बेंजामिन बोन्झीचे आव्हान ४-६, ७-५, ६-३ असे मोडून काढले. ही लढत दोन तास १६ मिनिटे चालली. अंतिम लढतीत भारताचा खेळाडू नसतानाही पुणेकर टेनिस चाहत्यांनी दोन्ही खेळाडूंना दिलेला प्रतिसाद अभूतपूर्व होता.

वेगवान आणि अचूक सव्हिस हेच ग्रीक्सपूरच्या विजयाचे वैशिष्ट्य राहिले. बोन्झीने दहाव्या गेमला ब्रेकची संधी साधून पहिला सेट जिंकला. पहिला सेट गमावल्यानंतर दुसऱ्या सेटला ११व्या गेमला ब्रेकची संधी साधून ग्रीक्सपूरने आघाडी घेतली आणि नंतर १२व्या गेमला आपली सव्हिस राखत दुसरा सेट जिंकला.

एक सेटच्या बरोबरीनंतर तिसऱ्या सेटला ग्रीक्सपूर अधिक आत्मविश्वासाने आणि आक्रमक खेळला. तिसऱ्या निर्णायक सेटमध्ये सुरुवातीला आणि शेवटी नवव्या गेमला ब्रेकची संधी साधून ग्रीक्सपूरने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

ग्रीक्सपूरने लढतीत १७ बिनतोड सव्हिस केल्या. बोन्झीनेदेखील ११ बिनतोड सव्हिस करताना आपले आव्हान राखण्याचा प्रयत्न केला, मात्र अचूकतेच्या आघाडीवर ग्रीक्सपूरने बाजी मारली. ग्रीक्सपूरला संपूर्ण लढतीत ब्रेकच्या सात संधी मिळाल्या. त्यापैकी ग्रीक्सपूरने तीन संधी साधल्या. बोन्झीला चारच संधी मिळाल्या. त्यापैकी त्याने एकच संधी साधली आणि तीन सेटमध्ये विजय मिळविला.

# राष्ट्रीय रोड रेस स्पर्धेत युथ गटात महाराष्ट्राच्या मुलींची बाजी

**सिन्नर : प्रतिनिधी**

२७ व्या राष्ट्रीय रोड रेस स्पर्धेतील दुसरा दिवस महाराष्ट्राच्या मुलींनी गाजवला. युथ विभागात महाराष्ट्राच्या श्रावणी परित, मानसी महाजन आणि नीम शुक्ला या त्रिकुटाने १५ किमीमध्ये खेळवण्यात आलेल्या या स्पर्धेत गोल्डमेडल पटकावले. समृद्धी महामार्गावर या रोडरेस सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




मुलींच्या युथ विभागातील १५ किलोमीटरच्या टाईम ट्रायलमध्ये ३५.६३ किमी प्रतितास वेगाची नोंद महाराष्ट्राच्या संघाने नोंदविली. राजस्थानच्या टीमने २५ मिनिटे ३९.३२९ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले तर कर्नाटकाने २६ मिनिटे ०१.५९० सेकंदाची वेळ देत कास्यपदक जिंकले.

इतर गटात मात्र पहिल्या दिवशीप्रमाणे दुसऱ्या दिवशीही राजस्थानने आपला वरचष्मा कायम ठेवला आहे.

पुरुषांच्या पुरुषांच्या ४० किमी टाईम ट्रायल, महिलांच्या ३० किमी एलिट गटात, महिला व पुरुषांच्या २० किमी टीम ट्रायल जुनियर गटात, तसेच सब जुनियर मुलींच्या आणि मुलांच्या १५ किमी युथ गटात राजस्थानने सुवर्ण पदकांची कमाई केली आहे.

## रोह्यात आज रंगणार कबड्डीचा थरार

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**धाटाव : प्रतिनिधी**

दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त आज रोह्यात जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेनिमित्त रायगड भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

स्पर्धा फायर स्टेशनसमोर अश्वत्थ मारुती मंदिर येथील मैदानात होणार आहे. जिल्ह्यातील आमंत्रित करण्यात आलेल्या नामवंत ३२ संघांना खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेत प्रथत क्रमांक २५००० रु., द्वितीय क्रमांक १५००० रु., तृतीय क्रमांक १०,००० रु., चतुर्थ क्रमांक १०,००० रु. तसेच मालिकावीर स्पोर्ट्स सायकल उत्कृष्ट पक्कड, उत्कृष्ट चढाई व पब्लिक हिरो यांना गौरविण्यात येणार आहे.



**पनवेल : रोहा तालुका शिक्षक सेलच्या उपाध्यक्षपदी धनराज उमाले यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना नियुक्तीपत्र भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या वेळी भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर, सरचिटणीस आनंद लाड, खजिनदार प्रमोद गोळे, शिक्षक सेलचे तालुकाध्यक्ष अशोक अहिरे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, खजिनदार प्रमोद गोळे, शिक्षक सेलचे तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाले आदी उपस्थित होते.**

# पनवेल महानगरपालिकेच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात



**पनवेल : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अंतर्गत सन २०२२-२३च्या पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात झाल्या. स्पर्धेमध्ये पनवेल महानगरपलिकेच्या हद्दीतील एकूण ७५ शाळेतील ४००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांना ११ नोव्हेंबर २०२२पासून प्रारंभ झाला होता. स्पर्धा आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख, अतिरीक्त आयुक्त २ संजय घरत, जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड रविंद्र नाईक व क्रीडा विभाग प्रमुख नामदेव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. सहभागी विद्यार्थ्यांमधून १०५० विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे, तसेच राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेकरिता १०५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

५० खेळाच्या सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये महापालिका हद्दीतील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

# शिवशक्ती महिला मुंबई आमदार चषकाचा मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

बंड्या मारुती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत नांदेडच्या बाबुराव चांदेरे फाउंडेशनने पुरुषांत, तर मुंबई शहराच्या शिवशक्ती संघाने महिलांत विजेतेपद पटकाविले. स्वस्तिकचा आकाश रूडले पुरुषांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला रोख २५,००० रु. देऊन गौरविण्यात आले, तर शिवशक्तीची अपेक्षा टाकळे महिलांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. तिला रोख १५,००० रु. देऊन सन्मानित करण्यात आले.

ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या शिवशक्ती महिला संघाने उपनगरच्या महात्मा गांधी स्पोर्ट्‌सचा ३९-१८ असा पाडाव करीत आमदार चषक व ६५,००० रु. चा धनादेश आपल्या नावे केला. उपविजेत्या महात्मा गांधीला चषक व ४५,००० रु. प्रदान करण्यात आले. शिवशक्तीने सुरुवातच झंजावाताने करीत महात्मा गांधीला पुरते नामोहरम केले. धारदार चढाया व भक्कम पकडी करीत शिवशक्तीने पूर्वार्धातच प्रतिस्पर्ध्यावर तीन लोन चढवित ३१-९ अशी भक्कम आघाडी घेतली. या आघाडीने खचलेल्या महात्मा गांधीकडून उत्तरार्धात प्रतिकार झालाच नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com